म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. १२८९

१९५४

# स्फूर्ति-विलास

अनुक्रम ..........
विभाग ..........
नों. दि.

काव्यविहारी

REFBK-0008348
REFBK-0008348

# स्फूर्ति-विलास

[ निवडक कवितांचा संग्रह ]

☆

कवि : काव्यविहारी

प्रस्तावना : वि. स. खांडेकर

REFBK-0008348

किंमत १॥ रुपया

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

☆

[या आवृत्तीच्या पुढील सर्व आवृत्तींचे हक्क तसेंच भाषांतर, रूपांतर, उतारे घेणें वगैरे इतर सर्व हक्क श्री. धोंडो वासुदेव गद्रे, B.A.LL.B. यांच्या स्वाधीन.]

☆

प्रथमावृत्ति : १९५४.

9.6.6.08
9.1.3.1084
92e.8
नों. दि. 20/12/4

# दोन शब्द

माझे मित्र श्री. धों. वा. गद्रे ऊर्फ काव्यविहारी यांच्या एकसष्टीच्या सुमारास त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह स्फूर्तिविलास प्रसिद्ध होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. एकसष्टावें वर्ष हें आयुष्याचा आढावा घेण्याच्या दृष्टीनें योग्य असें वर्ष आहे. विशी-पंचविशीपासून साठीअखेर मनुष्य अनेक स्वप्नांच्या मागें धांवत असतो. त्यांतलीं कांहीं सफल होतात, कांहीं होत नाहींत. पण हा काळ माणसाच्या कर्तृत्वाचा असल्यानें आपली प्रेरणा आणि परिस्थिति यांचा मेळ घालून जें कांहीं करतां येईल तें या कालखंडांत तो साध्य करतो. साठीनंतर सर्वच माणसांच्या बौद्धिक, शारीरिक आणि अन्य प्रकारच्या शक्ति निस्तेज होतात असें नाहीं. कांहीं माणसें स्वभावतःच चिरतरुण असतात. पण एक गोष्ट निश्चित आहे ती म्हणजे साठीनंतर क्वचित् एखादा मनुष्य विशेष पराक्रम गाजवूं शकत असला तरी तो पराक्रम त्याच्या आवडत्या क्षेत्रांतच होऊं शकतो. नवीं नवीं क्षेत्रें पादाक्रान्त करण्याचें हें वय नव्हे. म्हणूनच कुणीहि स्वतःच्या प्रिय असलेल्या क्षेत्रांत किती कार्य केलें हें साठीच्या आसपास थोड्याशा अलिप्तपणें पाहतां येतें.

चरितार्थाचा व्यवसाय म्हणून काव्यविहारींनीं बुधगांव संस्थानांत न्याय-खात्यांत नोकरी केली. पण ती नोकरी करीत असतांना लहानपणीं अंतःकरणांत जागृत झालेलें काव्यप्रेम त्यांनीं मोठ्या निष्ठेनें व निसरलपणानें सांभाळलें. शाळाकॉलेजांच्या चिमण्या जगांत आणि स्वप्नाळू वातावरणांत विशीच्या आंतबाहेर अनेक विद्यार्थ्यांना काव्यरचनेचा नाद असतो, त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं. वाङ्मयीन जगांतच अशा विद्यार्थ्यांच्या मनाची वाढ होत आलेली असते. साहजिकच छंद म्हणून लेखनाकडे त्यांचीं मनें वळतात. घरट्यांतून डोकावून बाहेर पाहणाऱ्या पांखरांच्या पिलांप्रमाणें भोंवतालच्या

विश्वाच्या विशाल पसाऱ्याकडे त्यांचीं मनें आतुरतेनें पाहत असतात. अशा मनःस्थितींत माणसाला काव्य सुचलें नाहीं तरच नवल. पण मुग्ध वयांतलें हें काव्यप्रेम आकाशांतल्या इंद्रधनुष्याप्रमाणें असतें. तें जितक्या लौकर उदयाला येतें तितक्याच लवकर मावळतें. पुढें वर्षानुवर्षें दऱ्याखोऱ्यांतून आणि डोंगरपहाडावरून उन्हातान्हांत प्रवास करीत असतांना मुग्ध वयांतली ही काव्याची कलिका कोमेजणार नाहीं, अशा रीतीनें बरोबर नेणें मोठें कठीण असतें. त्याला कवितेविषयीं तसाच जिव्हाळा मनांत असावा लागतो. तो काव्यविहारींच्या ठिकाणीं निःसंशय आहे हें या संग्रहावरून दिसून येईल.

या दृष्टीनें '**चिमकुला संसार**' ही त्यांनीं १९१८ सालीं लिहिलेली कविता व '**तूं शांत झोंप घेई**' ही १९५३ मध्यें लिहिलेली कविता या जोडीनें पाहण्याजोग्या आहेत. १९१८ सालीं काव्यविहारी कायद्याचा अभ्यास करण्यासाठीं मुंबईस होते. त्या वेळीं त्यांच्या भोंवतालच्या जीवनांतलें एक दृश्य त्यांनीं "**चिमकुला संसार**" या कवितेंत चित्रित केलें आहे. अकरा वाजून गेले कीं मुंबईच्या चाळींतला गजबजाट मंदावतो. पुरुषमाणसें कचेऱ्यांत जातात व बायकामाणसें घरांतली आवराआवर करण्यांत दंग होतात. अशा वेळीं लहान मुलांना खेळाची सुरसुरी येणें स्वाभाविकच असतें. लहान मुलांच्या दृष्टीनें सर्वांत सुंदर खेळ संसाराचा असतो. त्यांत त्यांना मोठी गंमत वाटते. पूर्वींच्या काळीं पुष्कळ पात्रें असलेलें नाटक नाटक कंपन्यांना विशेष आवडत असे. अशा नाटकांत कंपनींतल्या लहानथोर सर्व पात्रांना कामें मिळत. लुटुपुटीचा संसाराचा खेळ असाच आहे. वाटेल तितक्या लहान मुलां-मुलींना त्यांत भाग घेतां येतो. या खेळाचें काव्यविहारींनीं केलेलें वर्णन त्यांच्या शैलीवर व काव्यविषयक दृष्टिकोनावर सहज प्रकाश टाकील असेंच आहे. या "**चिमकुल्या संसाराचें**" चित्र ते असें रेखाटतात—

"शंख शिंपलेच किती
मांडुनि पाटावरती
मानुनि त्या देवमूर्ति
गंध-फुलांवांचुनि मधु करित पूजना.

चूल न सरपण कांहीं
सामुग्री पुरि नाहीं
त्यावांचुनि लवलाही
पाक सिद्ध होइ सकल बसति भोजना."

त्यानंतरचें हें चित्र पाहा—

" इतुकें वदुनी उठला
करिं घेउनि काठीला
बालशिपाई सजला
गस्त करी परि वरती दिवस तळपतो."

कल्पनेच्या भराऱ्यांनीं काव्यांत रंग आणण्यापेक्षां वास्तवाच्या चित्रणानेंच काव्यविहारी तें कार्य साधतात. त्यांच्या शैलींत कोणत्याहि प्रकारचा नटवेपणा नाहीं. एका अर्थानें ही आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट आहे. कारण काव्य-विहारींनीं काव्यलेखनाचे धडे गिरवायला सुरुवात केली, त्या वेळची ही कविता आहे. त्या काळीं गडकऱ्यांच्या कवितेचा रसिक मनावर फार मोठा पगडा होता. कल्पनेची चमत्कृति आणि सुंदर पण किंचित् कृत्रिम भाषा हे गडकऱ्यांच्या कवितेचे दोन मोठे विशेष होते. भोंवतालचें वातावरण असें असूनहि काव्यविहारींची शैली पहिल्यापासून अगदीं साधी राहिली; प्रसंगीं गद्यप्राय वाटण्याइतकी ती साधी राहिली. याचें कारण प्रथमपासून केशव-सुतांच्या काव्याविषयीं त्यांना वाटणारें प्रेम हें तर खरेंच, पण रचनेच्या बाबतींत केशवसुतापेक्षां देवलांच्या पद्यरचनेचा त्यांच्यावर अधिक परिणाम झाला आहे असें मला वाटतें. देवलांप्रमाणें काव्यविहारीहि मूळचे सांगली-नजीकच्या हरीपूरचे. देवलांनीं ' शारदेंत ' पार्श्वभूमि म्हणून आपल्या या जन्मभूमीचीच योजना केली आहे. ' माझें जन्मग्राम ' सारख्या काव्य-विहारींच्या कवितांतहि त्याच परिसराचें वाचकांना दर्शन होतें. देवलांची ' शारदा ' ज्या संगमनाथाला " जय कृष्णातटवासा ! " या पदांत नवस करते, त्याचें स्मरण " संगमनाथाचिया मंदिरीं । घुमला घंटानाद

मनोहर " अशा शब्दांनीं काव्यविहारी करतात. त्यांच्या बालपणीं देवलांचीं पदें घरोघर गुणगुणलीं जात होतीं. त्यामुळें त्यांच्या कविमनाला तो आदर्श आपल्यापुढें ठेवावासा वाटला असेल.

प्रसाद हा देवलांच्या काव्याचा अत्यंत प्रभावी गुण होता. अनेक दृष्टींनीं कवीला तो उपकारक ठरतो. काव्यविहारींच्या बाबतींतहि हा अनुभव येतो. अगदीं निवळ शंख पाणी असलेल्या जलाशयासारखी त्यांची कविता आहे. त्या जलाशयाचा तळ जसा स्पष्ट दिसतो, तसा काव्यविहारींचा आशयहि त्यांच्या कवनांतून स्वच्छपणें प्रगट होतो. इथें अन्वयाची दगदग नाहीं, अर्थाची ओढाताण नाहीं, गूढगुंजन नाहीं, कोडें सोडविल्याप्रमाणें पदोपदीं डोकें खाजवून कविता वाचण्याची जरूरी नाहीं. काचेच्या तावदानांतून प्रकाश जसा आंत यावा, त्याप्रमाणें कवीचें मनोगत सहजासहजीं वाचकांच्या मनांत उतरतें. अशी सुबोध व प्रसन्न रचना करतां येणें हा एक मोठा गुण आहे यांत शंकाच नाहीं. पण या गुणाच्या पोटीं ज्या मर्यादा निर्माण होतात, त्यांची जाणीवहि वाङ्मयचर्चा करतांना मनांत ठेवली पाहिजे. देवलांची काव्यरचना सर्वत्र प्रसन्न असली तरी तिच्यांतहि दोन स्पष्ट भाग पडतातच. **मृच्छकटिक** व **शापसंभ्रम** या नाटकांतील देवलांचीं पदें पाहावींत आणि त्यांची **शारदा** व **संशयकल्लोळ** यांच्यांतल्या पदांशीं तुलना करावी. दुसऱ्या रचनेंत कांहीं तरी कमी आहे असें जाणवल्यावांचून राहत नाहीं. थोडें तिखटमीठ कमी झालें तर स्वयंपाकाची रुचि लगेच बदलते, तसेंच हें आहे. **शापसंभ्रम** व **मृच्छकटिक** या नाटकांतलीं पदें प्रसन्न तर आहेतच, पण त्या प्रसन्नतेला कल्पनेच्या आणि भावनेच्या सौंदर्याची भरपूर जोड मिळाली आहे. त्यामुळें तीं पूर्णपणें काव्यात्मक वाटतात. काव्यविहारींच्या कवितेवर देवलांच्या ज्या पद्यरचनेचा परिणाम झाला असावा ती मुख्यत: शारदेंतील दिसते. त्यामुळें ' जगाचा न्याय ' किंवा '**चिमकुला संसार**' अशा त्यांच्या जिव्हाळ्यानें भरलेल्या कवितांतसुद्धां एक प्रकारचा ओकेपणा जाणवतो. त्याचें कारण लक्षांत यावें म्हणूनच या मुद्द्याचा एवढा प्रपंच केला.

मात्र याच अनुषंगानें काव्यांतला ' प्रसाद ' या गुणाविषयीं थोडें खोलांत जायला हरकत नाहीं. क्लिष्टता किंवा दुर्बोधता हा काव्याचा काय अगर

अन्य वाङ्मयाचा काय गुण होऊं शकत नाहीं. तो उघड उघड दोष आहे हें मला मान्य आहे, पण केवळ प्रसाद या गुणानें काव्याचा मुख्य हेतु सफल होतो कीं काय या खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. केशवसुतांच्या पिढींतले टिळक–विनायक, मधल्या पिढींतले गिरीश व भ. श्री. पंडित, आणि त्यानंतरचे वि. म. कुलकर्णी व सौ. संजीवनी मराठे एवढेच कवि कवयित्री उदाहरणादाखल घेतले, तर प्रसादगुणाची मर्यादा सहज लक्षांत येईल. **वनवासी फूल**सारखें खंडकाव्य, **अभंगांजलि** आणि अनेक स्फुट कविता यांत टिळकांची काव्यशक्ति चांगल्या रीतीनें प्रकट झाली आहे; पण उत्कटता, आर्तता, कल्पकता, इत्यादि गुणांत टिळक, केशवसुतांची कधींच बरोबरी करूं शकत नाहींत. केशवसुतांच्या अगदीं मोजक्या कां होईना, कविता दीर्घकाल मनांत रेंगाळत राहतात. बकुळीचीं फुलें कोमेजलीं तरी त्यांचा थोडा ना थोडा वास राहतो. या प्रकारची कविता तशी असते. पण प्रसन्न रचनेमुळें प्रथमदर्शनीं मन आकर्षून घेणारी कविता कल्पकता, चिंतन आणि अंतर्मुखता यांच्यांत घोळली जात नाहीं. अशी कविता अंतःकरणाला रुजत नाहीं किंवा रुतत नाहीं. ती त्याला ओझरता स्पर्श करून जाते.

कवि विनायक यांचेंहि उदाहरण या संदर्भात मला आठवतें. विनायकांच्या काळीं ते टिळक–केशवसुतांच्या बरोबरीचे कवि मानले जात. तो काळ पारतंत्र्याविरुद्ध झगडा करण्याकरितां स्वातंत्र्याची भावना चेतविण्याचा होता. विनायकांच्या कवितेंत गेलेल्या वैभवशाली काळाबद्दलची भक्ति, वर्तमानकाळांतल्या निर्बलतेची चीड आणि भविष्यकाळाविषयीं वाटणारी आशा या गोष्टी मोठ्या प्रसन्न शब्दांत प्रकट झाल्या.

" **तळहातीं टेकुनि ही स्वशिरातें बैसली** " हें हतभागिनीच्या रूपानें त्यांनीं केलेलें वर्तमानकालीन देशस्थितीचें वर्णन, " **विळा कोयताच जयांचीं काय तीं हत्यारें । तेच वीर बनले समयीं मावळे मराठे** ", या ओळींतून व्यक्त होणारा गतकालाचा अभिमान आणि " **रात्र सरे तेव्हां उगवे दिनाहि पूर्व वाटे** " या ओळींतून प्रकट झालेला आशावाद या सर्व गोष्टी लोकांच्या जिव्हाग्रीं खेळाव्यात अशाच होत्या. अभिजात ऐतिहासिक कविता लिहिणाऱ्या " माधव " कवींनीं " **कवि विनायका,**

सुकविनायका" असे विनायकांना उद्देशून उद्गार काढले ते कांहीं केवळ यमकाच्या हौसेनें नव्हेत. माधवांच्या कविमनाच्या विकासाला विनायकांच्या कवितेचें साहाय्य झालें असावें हें उघड आहे. "काव्य आणि काव्योदय" लिहिणारे आणि श्रेष्ठ प्रतीचे काव्यमर्मज्ञ असलेले प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांनीं १९२०।२१ च्या सुमारास विनायकांची कविता संग्रहरूपानें प्रसिद्ध झाली, तेव्हां तिला प्रस्तावना लिहिली व कवीच्या काव्यशक्तीचें कौतुक केलें तें याच कारणामुळें. पण हें सर्व मान्य करूनहि आज १९५४ सालीं आपण विनायकांची कविता वाचूं लागलों तर त्यांतल्या किती कविता आपल्या मनाला धुंद करून सोडतात?

देशाला स्वराज्य मिळाल्यामुळें गतकालाचा अभिमान, पारतंत्र्याची चीड वगैरे पूर्वी ज्वलन्त वाटणारे विषय आतां निस्तेज झाले आहेत. केवळ प्रसादपूर्ण रचनेमुळें कांहीं कविता मनाची पक्कड घेत नाहीं. किंवा तिथें घुमत आणि अंतर्मनांतलें गूढ संगीत गात राहत नाहीं. कल्पनेचा, भावनेचा किंवा विचाराचा तसाच हृदयंगम आविष्कार असेल तरच अशा प्रकारच्या कवितेचा सुगंध दीर्घकाळ टिकूं शकतो. "Captain O my Captain" ही व्हिटमनची लिंकनच्या मृत्यूवरील कविता आजहि आपण उचंबळून आलेल्या मनानें वाचूं शकतों. लिंकनपेक्षां शिवछत्रपतींचें जीवन आणि मरण आपणाला शतपटींनीं जवळचें आहे. असें असूनहि या कवितेची बरोबरी करूं शकेल अशी कुठली कविता विनायकांच्या लेखणींतून उतरली आहे?

जवळजवळ तीन तपांपूर्वी विनायकांच्या कविता–संग्रहाला प्रस्तावना लिहितांना वासुदेव बळवंत पटवर्धनांना या गोष्टींची जाणीव होती. आपल्या प्रस्तावनेंत '**सुवास**' '**स्त्री आणि पुरुष**" इत्यादि चार कवितांचा उल्लेख करून, त्या विनायकांच्या इतर कवितांपेक्षां अगदीं निराळ्या वाटतात, केशवसुतांच्या काव्यसंग्रहांत त्या सहज शोभतील असें स्पष्ट विधान त्यांनीं केलें आहे. याचा अर्थ उघड आहे. विनायकांची रचना केशवसुतांपेक्षां पुष्कळच प्रसादपूर्ण होती. तत्कालीन भावनांचेंहि त्यांना साहाय्य मिळालें. पण ज्याला आपण अस्सल काव्य म्हणतों, जें बाणाच्या टोकासारखें हृदय विंधून जातें, जें रातराणीच्या सुगंधासारखे सहज वाऱ्यावरून येऊन मन धुंद करून सोडतें, जें अग्निज्वाळेप्रमाणें दाहक असूनहि मोहक वाटतें. जन्म, मृत्यु आणि

प्रीति यांच्या साक्षात्कारानें मानवी मनाला होणारी भव्यतेची गूढ जाणीव ज्याच्या क्षणिक स्पर्शानें उजळून जाते तें खरें काव्य! असें काव्य विनायकांत फार थोडें आहे हें विधान ज्यांना अतिरंजित वाटेल त्यांनीं भारतांतल्या स्त्रीरत्नांवर विनायकांनीं लिहिलेल्या कविता पुन्हा एकदां वाचून पाहाव्या. ' कृष्णाकुमारी 'सारख्या एखाद्या कवितेलाच काव्यात्मतेचा स्पर्श झाल्याचें त्यांना आढळून येईल, तोहि ओझरता. लग्नसमारंभांत पाहुण्याच्या हाताला अत्तर लावतात ना तसा. कांटेकोर दृष्टीनें पाहिलें तर विनायकाच्या या स्त्री-गीतांत सुलभ व क्वचित् सुभग पद्यरचनेपेक्षां अधिक कांहीं आढळणार नाहीं. त्या काळीं मेळ्यांतलीं पद्यें रचणाऱ्या अनेकांच्या अंगीं एवढी काव्यशक्ति असे.

मूर्ति-भंजनाची सुरसुरी आल्यामुळें मी हें लिहीत आहें असें वाचकांनीं कृपा करून समजूं नये. आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासांत विनायकांचें विशिष्ट स्थान आहे, हें मी अमान्य करीत नाहीं. पण प्रसादगुण व तात्कालिक राष्ट्रीय भावना यांच्या संगमामुळें त्यांच्या कवितेचें जें मूल्यमापन झालें तें चिरंतन काव्यगुणांच्या दृष्टीनें मनाला पटत नाहीं हें मला सांगावयाचें आहे. वर्तमानकाळापेक्षां भविष्यकाळच व्यक्तीच्या काय किंवा कलेच्या काय कर्तृत्वाची खरी पारख करूं शकतो. या विधानांत संपूर्ण नसलें तरीं बरेंच तथ्य आहे.

काव्यविहारींच्या कवितेविषयीं बोलतांना रस्ता सोडून पाऊलवाटेनें मी बराच दूर भटकत आलों आहें, याची मला कल्पना आहे. पण ही भ्रमंती निष्कारण नाहीं. तीन तपांपेक्षां अधिक काळ कवितेची उपासना करणाऱ्या कवीच्या निवडक कवितांचा परिचय करून देतांना, हें बरें आहे, हें मध्यम आहे, हें चांगलें आहे असें विद्यार्थ्यांच्या गृहपाठावर शेरे मारावेत त्याप्रमाणें अभिप्राय देण्यांत काय अर्थ आहे? नवोढा आणि नातवंडें झालेली पुरंध्री यांचें स्वागत काय एकाच पद्धतीनें करावयाचें? छे! नुकत्याच लग्न झालेल्या तरुणीची आपण थट्टा करूं. तिची सलज्जता पाहण्यांत मौज आहे. प्रौढ स्त्रीशीं बोलतांना संसाराच्या सुखदुःखांच्या गोष्टी करण्यांत सुख आहे, म्हणूनच अनेकांना अप्रस्तुत वाटेल अशी एका मुद्द्याची थोडी चर्चा मीं केली आहे. कवींचीं मूल्यमापनें, कालांतरानें लेखकांच्या लोकप्रियतेंत पडणारे फरक, वाङ्मयांतलें कालनिष्ठ सौंदर्य आणि चिरंतन सौंदर्य, वाङ्मयगुणांच्या

बाबतींतला तरतम भाव इत्यादिकांची चर्चा डोळस दृष्टीनें पुन्हा पुन्हा व्हायलाच हवी. सोनें बावनकशी आहे कीं हिणकस आहे हें ठरवायला तें अग्नींत एकदांच टाकावें लागतें. पण कर्तृत्व, कवित्व, साधुत्व इत्यादिकांना मात्र हा नियम लागू नाहीं. प्रसंगीं प्रत्येक पिढीला त्यांना हें अग्निदिव्य करावें लागेल.

डग्लस बुश या लेखकानें लिहिलेलें English Poetry हें पुस्तक नुकतेंच माझ्या वाचनांत आलें. हा एक इंग्रजी कवितेचा छोटा इतिहास आहे. पण तो इतिहास लिहितांना लेखकानें जुन्या कवींचें नवें मूल्यमापन कसें केलें आहे हें पाहण्याजोगें आहे. ब्लेक, बायरन, ब्राउनिंग वगैरे कवींवरले त्याचे अभिप्राय वाचले म्हणजे आपल्याकडे टीका, चर्चा, रसास्वाद वगैरेंच्या नांवाखालीं जें लिखाण केलें जातें त्याचा क्लिष्टपणा व उथळपणा मनाला बोचल्यावांचून राहत नाहीं. म्हणूनच काव्यविहारींच्या कवितेंत प्रसाद आहे, तो फार चांगला आहे अशीं स्थूल विधानें न करतां या प्रसादगुणाची शक्ति व मर्यादा याविषयीं थोडेसें सोदाहरण लिहिलें.

काव्यविहारींच्या शैलीला अनुकरणाच्या वयांत देवल व केशवसुत यांचें जें वळण लागलें तें तसेंच कायम राहिलें. गोविंदाग्रज, बालकवि आणि तांबे या वडील कवींच्या शैलीचा जसा त्यांच्यावर परिणाम झाला नाहीं, त्याच-प्रमाणें यशवंत, माधव जुलियन, गिरीश प्रभृति समकालीनांच्या शैलीनेंहि त्यांना आकृष्ट केलें नाहीं. मग बोरकर कुसुमाग्रजासारख्या तरुण कवींचा त्यांच्यावर कोणताच परिणाम झाला नसला तर त्यांत नवल कसलें ?

काव्यविहारींची ही पृथगात्मता, केवळ शैलींतच दिसून येते असें नाहीं. त्यांचे काव्यविषय व ते फुलविण्याची त्यांची पद्धति यांतहि खास त्यांची अशी एक पाऊलवाट आहे. काव्यक्षेत्रांत पाऊल टाकतांना त्यांनीं केशव-सुतांना गुरु मानलें हा कांहीं त्या काळच्या केशवसुतांना गुरु मानण्याच्या फॅशनचा एक भाग नव्हता. 'तुतारी', 'गोफण', 'स्फूर्ति' 'नवा शिपाई' वगैरे कवितांत केशवसुतांनीं अपूर्व आवेशानें ज्या सुधारणावादाचा पुरस्कार केला त्यानें काव्यविहारींच्या सामाजिक जाणिवेला चेतना दिली. काव्यविहार या काव्यविहारींच्या पहिल्या संग्रहांत कवींचे अनेक सवाल आले आहेत. आपल्या भोंवतालच्या जगांत काव्यविहारी जे सामाजिक अन्याय पाहत होते

त्यांच्यावर या सवालांत ते तुटून पडले आहेत. त्यांतला एकहि सवाल त्यांनीं स्फूर्तिविलासांत घेतलेला नाहीं. यावरून काव्यगुणाच्या दृष्टीनें त्या कविता त्यांना आतां विशेष महत्त्वाच्या वाटत नाहींत हें उघड आहे. पण मौज अशी कीं एक उदयोन्मुख कवि म्हणून काव्यविहारी लोकप्रिय झाले ते त्या सवालामुळेंच. त्या सवालांचें उगमस्थान जसें त्यांच्या भोंवतालच्या सामाजिक जीवनांत होतें, तसेंच तें केशवसुतांच्या कवितेंतहि होतें. पण 'तुतारी' किंवा 'नवा शिपाई' हा केशवसुतांच्या काव्यात्म व्यक्तित्वाचा एक भाग होता. या भागांत त्यांच्यांतला कवि आणि सुधारणावादी हे दोघेहि एका उच्च गंभीर प्रोत्साहक स्वरानें गात. पण केवळ काव्यगुणांची कसोटी लावली तर अर्धी अधिक तुतारी ही केवळ आवेशपूर्ण पद्यरचना आहे असेंच आढळून येईल. फक्त अशाच प्रकारच्या कविता केशवसुत लिहीत गेले असते तर आजच्या मूल्यमापनांत विनायकासारखीच त्यांची स्थिति झाली असती. वस्तुस्थिति अशी आहे कीं सावेश आणि सुधारणावादी कविता हा केशवसुतांच्या प्रतिभेचा एक पैलू आहे. जीवनांतल्या प्रत्येक अनुभवाला ते आर्ततेनें आळवितात. "**गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे!**" या कवितेंत ते साध्या कौटुंबिक प्रेमाच्या भावनेनें कसे फुलून जातात. '**क्षणांत नाहींसे होणारे दिव्याभास**' या कवितेंत त्यांच्यातला कलावंत जागृत होऊन, आपल्या पायांत पडलेल्या व्यावहारिकतेच्या बेड्या किती सूक्ष्म पण आर्त दृष्टीनें पाहतो'. 'झपूर्झा' सारख्या कवितेंत हाच कलावंत त्या बेड्या तोडून आपले विशाल पंख पसरून आकाशांत उड्डाण घेतो आणि चांदण्यांशीं गोष्टी करूं लागतो. केशवसुतांच्या कवितेंत असे आठ दहा निरनिराळे पैलू आहेत. त्यांच्या सुधारणावादाप्रमाणें इतर पैलूंचा काव्य-विहारीवर परिणाम झाला असता तर त्यांच्या कवितेचें स्वरूप कदाचित् संपूर्णपणें पालटलें असतें. पण कां कोण जाणे, काव्यविहारींना आपल्या गुरूच्या अधिक काव्यात्म अशा पैलूविषयीं विशेष आकर्षण वाटलें नाहीं.

मात्र काव्यविहारींनीं जो सुधारणावाद आरंभीं स्वीकारला तो अगदीं मनापासून. त्या सुधारणावादाचा मागोवा घेत घेत आणि त्यांत जीवनांतले विविध अनुभव मिसळीत ते कविता लिहीत राहिले. त्यामुळें सर्व प्रकारच्या विषमतेची त्यांना वाटणारी चीड हा त्यांच्या कवितेचा एक विशेष झाला.

'जगाचा न्याय' सारख्या कवितेंत या विषमतेचा त्यांनीं केलेला धिक्कार थोडासा गद्यप्राय वाटेल, पण 'खार आणि घार' या कवितेंत झाडावर हांसत बागडणारी खार आणि तिच्यावर झडप घालून आपली भूक भागविणारी घार यांचें सरळ, साधें व सुंदर चित्रण करून त्यांनीं ज्या चार ओळी लिहिल्या आहेत त्या पंच खंडांत हरघडी घडणाऱ्या जुलुमांची जणू कांहीं आपणाला जाणीव करून देतात. त्या ओळी अशा आहेत......

**सोसाट्यानें ये खालीं तीरासम ती घार**
**फांदीवरुनी एक उठे अस्फुटसा चीत्कार**
**जीव चिमुकला झडपोनी पार उडाली घार**
**गालांवरुनी ओघळली माझ्या अश्रूधार**
**आर्तांचे चीत्कार किती जाती रोज विरून**
**आक्रंदन परि दुबळ्यांचें जगीं ऐकितो कोण ?"**

या कवितेपासून 'तीन खून' सारख्या कवितेपर्यंत जो जो अन्याय त्यांना दिसला किंवा भासला, त्याच्या त्याच्या विरुद्ध त्यांच्या मनानें आपली चीड व्यक्त केली आहे. '**माझी कविता**' या कवितेंत आपल्याला काव्य कसें स्फुरतें याचें त्यांनीं वर्णन केलें आहे ( पृष्ठ २ ), तें या दृष्टीनें वाचनीय आहे. त्यांचें मन जसें सृष्टि-सौन्दर्यांत रमतें, तसेंच तें निर्मिति करणारा मानव पाहूनहि आनंदित होतें. आकाशांत डौलानें गिरक्या घेणाऱ्या कबूतरांना झडपणारा बहिरीससाणा पाहून तें जसें व्यथित होतें, तसेंच युद्धांतल्या बॉंबहल्ल्यांनीं उद्ध्वस्त होणारी निरागस खेड्यांची करुण कहाणी ऐकूनहि तें खिन्न होतें.

या कविमनानें जी काव्यनिर्मिति झाली ती बुधगांवसारख्या ना खेडें ना शहर अशा वातावरणांत आणि कज्जे व कायदे यांच्या दैनंदिन सहवासांत. हा आयुष्यक्रम काव्यविहारींच्या कवितेला एका दृष्टीनें उपकारक झाला हें खरें आहे. त्यांची कविता सतत आपल्या पाऊलवाटेनेंच चाल करीत राहिली. रविकिरण मंडळाचे वृत्तांचे आणि विषयांचे नवे नवे प्रयोग, तांबे आणि माधवजुलियन यांची प्रेमकविता, वीर व उदात्त या रसांचा कालोचित पद्धतीनें

विभाग 27.3.04 72 e ०१२२५४४ नों. दि.

आविष्कार करणारी कुसुमाग्रजांची कविता आणि रेगें-मर्ढेकरांची जविनाची सफलता आणि विफलता अक्षुण्ण मार्गांनीं व्यक्त करणारी कविता या सर्वांच्या संस्कारापासून काव्यविहारी अलिप्त राहिले. त्यांनीं हे सर्व प्रवाह पाहिले पण कुठल्याहि प्रवाहाबरोबर ते वाहत गेले नाहींत. त्यामुळें शहरांत न आलेल्या धीट पण खेडवळ मुलीच्या चेहऱ्यावर जो प्रसन्न मोकळा भाव दिसतो त्याचा आढळ त्यांच्या कवितेंत होतो. विषय, शैली, वृत्तें या सर्व बाबतींत अथपासून इतिपर्यंत स्फूर्तिविलासचा चेहरामोहरा अगदीं एक प्रकारचा आहे. कवीचें व्यक्तित्व कुठेंहि द्विधा झालेलें दिसत नाहीं. त्याचीं जीवनमूल्यें निश्चित आहेत. वाङ्मयीन मूल्यें ठाम आहेत.

पण प्रत्येक नाण्याला दुसरी बाजू असतेच. एका बाजूला राहून काव्याची उपासना करावी लागल्यानें काव्यविहारींच्या कवितेला जसे कांहीं फायदे झाले तसेच या विशिष्ट परिस्थितीमुळें तिचे कांहीं तोटेहि झाले. ती एकसंध आहे, पण तिच्या कक्षा मर्यादित आहेत. जीवनाचे व वाङ्मयाचे नवे नवे अनुभव लेखकाच्या विविध सुप्त शक्तींना अनेकदां जागृत करूं शकतात. त्यामुळें त्याच्या प्रतिभेचा विकास अगदीं अनपेक्षितपणें होऊं शकतो.

स्फूर्ति-विलासांत अशा आवाहनानें होणारीं परिवर्तनें आढळत नाहींत. पण यांत जें आहे, तें स्वच्छ भावनांतून स्फुरलेलें, निर्मळ विचारांनीं भरलेलें, क्वचित् सुंदर कल्पनेनें नटलेलें असें आहे. काव्यविहारींनीं प्रेमाच्या कविता फार थोड्या लिहिलेल्या आहेत. पण त्यांच्या अगदीं प्रारंभींच्या ‘ **हृदयाचें गान** ’ या कवितेंतील खालील नाजुक ओळी मला नेहमींच मोहक वाटत आल्या आहेत.

सौख्याच्या तारांचें नाजुकसें जाळें
आहे हृदयीं माझ्या सखये ! विणलेलें
प्रणयाचा मंद अनिल फिरतां त्यांतून
झंकारांतुनि उमटे अस्फुट मधु गान
तान सूर ताल सकल त्यांतच मानून
ऐक गडे ऐक जरा हृदयाचें गान.

१९१८ सालीं कवीनें जें प्रेमाचें दर्शन घेतलें तें असें होतें. तब्बल चौतीस पस्तीस वर्षें जीवनाचा आणि संसाराचा अनुभव घेऊन त्यानें १९५२–५३ सालीं लिहिलेल्या " **कृष्णवर्तुळें** " आणि ' **तूं शांत झोप घेई** ' या कविता पाहाव्यात. किती साध्या, पण प्रेमाच्या सत्य स्वरूपावर केवढा प्रकाश टाकणाऱ्या आहेत त्या ! त्या आपल्या सहचारिणीला उद्देशून त्यांनीं लिहिल्या आहेत हें उघड आहे. " कृष्णवर्तुळें " या कवितेचा प्रारंभच किती करुणरम्य आहे !

**" जीव कळवळे बघुनी तुझिया नयनाखालीं कृष्णवर्तुळें. "**

आणि तिचा शेवट असा आहे.

**माझ्यासाठीं कष्ट एवढे**
**जीव लावुनी करिसी वेडे !**
**सदा राबतां बघुनि तुजकडे**
**काय तुझ्यास्तव केलें मी हें मनांत येतां जीव कळवळे**
**जीव कळवळे बघुनी तुझिया नयनाखालीं कृष्णवर्तुळें**

या दोन कविता तरुण मनाला तितक्याशा आवडणार नाहींत. पण ज्यांची पन्नाशी जवळ आली आहे अथवा उलटली आहे, दोन दोन तपें ज्यांचे संसार झाले आहेत, ज्यांनीं अग्नीभोंवतीं सात पावलें चालून घेतलेली शपथ अग्नीवरून वर्षानुवर्षें चालून पाळली आहे अशा जोडप्यांनाच या कवितेंतल्या साध्यासुध्या शब्दांच्या खालीं केवढी सरस्वती लपलेली आहे याची कल्पना येईल.

' **कृष्णेच्या पुलावरून** ', ' **माझें जन्मग्राम** ' इत्यादि कवितांना याच जिवंतपणाचा स्पर्श झाला आहे. मग माझ्यासारख्या सांगलीकराला त्या कवितांत अनुभूतीचा वेगळा गोडवा आढळला तर त्यांत आश्चर्य कसलें ? ' **मंजुळा** ', ' **भानुदास** ', ' **नंदीवाला** ' हीं कवीनें रेखाटलेली शब्द-चित्रें आहेत. भानुदासाचा विषय कारुण्यपूर्ण आहे. पण कवीचें कौशल्य ' **मंजुळेंत** ' अधिक प्रगट झालें आहे. अगदीं वर्डस्वर्थची आठवण यावी असें. ' **खार आणि घार** ', ' **शिकार** ', ' **माझी मैत्रीण** ' यांत कवीच्या

भावनांची सुरेख ओळख पटते. या भावनांचा आविष्कार हृद्य आहे. '**दोन पतंग**', '**पाळीव पोपटास**', 'उंबरांतले किडे', '**मैना**' वगैरे कवितांत कवीचें स्वातंत्र्य-प्रेम, संकुचित जीवनाविषयीं त्याला वाटणारा तिटकारा, लहानमोठे स्वार्थी संघर्ष पाहून त्याच्या मनाला येणारी उबग, या गोष्टी चांगल्या रीतीनें चित्रित झाल्या आहेत. रूपकांचा आश्रय केल्या-मुळें त्यांत काव्याची चमक आढळते. '**शंकर आणि नंदी**', '**विमान आणि कोंबडा**' या उपरोधाच्या पोटीं स्फुरल्या आहेत. 'राजा आणि माळी' ही विषयाच्या दृष्टीनें 'Miller of the Dee' सारखी वाटणारी कविता कवीला निरीक्षणांतूनच सुचली असावी. "**पायरीवर**" या कवितेंतली बंडखोर वृत्ति आणि '**वेडीं मुलें**' मधली आर्त भावना या कुणाला आव-डणार नाहींत ? '**बकुळीखालीं**' व '**विहगास**' या कविता म्हणजे स्फूर्ति-विलासाचीं भूषणें आहेत.

काव्यविहारींच्या कवितेचें स्वरूप असें आहे. ती नटवी नाहीं. कारण '**सुंदरता वारुणी नव्हे जग हैवान कराया**' अशी त्यांची श्रद्धा आहे. ती पुण्यामुंबईकडची किंबहुना सांगली कोल्हापूरकडली १९५४ ची तरुणी नाहीं. वेषभूषा, केशभूषा वगैरे बाबतींत ती तशी थोडीफार जुन्या वळणाचीच आहे. पण साधेपणामुळें सुंदर दिसणारा तिचा चेहरा, तिचे प्रसन्न आणि निर्मळ डोळे, तिची अकृत्रिम व शालीन चाल यांच्यामुळें ती कुणाचेंहि लक्ष सहज वेधून घेईल.

सांगलीच्या शाळेंतल्या आम्हां दोघांच्या बाळपणाची आठवण हे दोन शब्द लिहितांना मला होत आहे. तें बालपण परत यावें असें अनेकदां मनांत येतें. ते **खाडिलकर** हेडमास्तर, ते **शंकरशास्त्री केळकर** आणि **देवधर-शास्त्री**, ते **मुद्गल** आणि **अळूरकर मास्तर**, ते **गाडगीळ तालीम मास्तर**, शाळेमागच्या क्रीडांगणावरील ते क्रिकेटचे सामने, त्या क्रीडांगणाच्या कोप-ऱ्याला असलेलें तें उंच विशाल चिंचेचें झाड हें सारें सारें क्षणभर कां होईना, परत यावेंसें वाटतें व तें शक्य नाहीं हें दुसऱ्याच क्षणीं कळतें-कारण काव्यविहारींनीं किंवा मी लेखणीची पहिली ओळ लिहिण्यापूर्वीच आमचे देवल सांगून गेले आहेत. "**बाळपणींचा काळ सुखाचा आठवतो घडिघडी । तशि न ये फिरुनि कधीं घडी.**" आम्हां दोघांनाहि,

दोघानांच काय पण जगांतल्या प्रत्येक माणसाला—पुढेंच गेलें पाहिजे. या पुढच्या काळांत काव्यविहारींना चांगलें आरोग्य लाभो आणि 'विहगास' या कवितेंतल्या

"नभ तुडवित जा, ढग कापित जा
बंध धरेचे सकल झुगारुनि, रविमंडल तूं भेदुनि जा"

या ओळींतलें स्फुरण घेऊन त्यांची काव्यशक्ति त्यांना आयुष्यांतील पुढील प्रवासांत सतत सोबत करो असें मी मनःपूर्वक इच्छितों.

१६।९।१९५४ पुणें. } वि. स. खांडेकर.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कविता | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | प्रभुंचरणीं | १ |
| २ | माझी कविता | २ |
| ३ | सांत्वन | ४ |
| ४ | हृदयाचें गान | ५ |
| ५ | चिमुकला संसार | ७ |
| ६ | सौंदर्य म्हणजे | १० |
| ७ | मंजुळा | ११ |
| ८ | जाईच्या फुलास | १३ |
| ९ | खार आणि घार | १५ |
| १० | सदानंद | १७ |
| ११ | कृष्णेच्या पुलावरून | २० |
| १२ | शिकार | २३ |
| १३ | दोन पतंग | २५ |
| १४ | माधुरी | २७ |
| १५ | जगाचा न्याय | २९ |
| १६ | मोटेवरचें गाणें | ३१ |
| १७ | पाळीव पोपटास | ३३ |
| १८ | मैना | ३५ |
| १९ | माझें जन्मग्राम | ३७ |
| २० | उंबरांतले किडे | ३९ |
| २१ | तुझा देव | ४१ |
| २२ | शंकर आणि नंदी | ४३ |
| २३ | उत्तरेकडे | ४६ |
| २४ | पायरीवर | ४८ |
| २५ | वीरमाता | ५० |
| २६ | देवी चामुंडा | ५३ |

| क्रमांक | कविता | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २७ | विमान आणि कोंबडा | - | ५५ |
| २८ | माझा देव - | - | ५७ |
| २९ | यंत्र - | - | ५९ |
| ३० | नवा मानव - | - | ६१ |
| ३१ | माझी मैत्रीण - | - | ६३ |
| ३२ | राजा आणि माळी | - | ६६ |
| ३३ | बकुळीखालीं - | - | ६८ |
| ३४ | भानुदास - | - | ७० |
| ३५ | वेडीं मुलें - | - | ७२ |
| ३६ | ती रात्र - | - | ७४ |
| ३७ | कृष्णवर्तुळें - | - | ७६ |
| ३८ | नंदीवाला - | - | ७८ |
| ३९ | प्रदक्षिणा - | - | ८१ |
| ४० | तीन खून - | - | ८३ |
| ४१ | महर्षि - | - | ८५ |
| ४२ | विहगास - | - | ८७ |
| ४३ | तूं शांत झोप घेईं | - | ८९ |
| ४४ | स्फूर्ति - | - | ९१ |
| ४५ | पंडित जवाहरलाल | - | ९३ |
| ४६ | एक मागणें - | - | ९५ |


---

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३९ | २१ | हाते | होते |
| ४२ | ३ | होई | होइ |
| ५३ | २० | पाह | पाहे |
| ९२ | ११ | कवि वदनातुनि | कविवदनांतुनि |

# निवेदन

जीवनमार्गावरील एका विशिष्ट सीमेचें उल्लंघन करीत असतांना, स्फूर्ति-विलास हा माझ्या निवडक कवितांचा संग्रह मी प्रेमळ वाचकांच्या हातीं देत आहें. काव्यविहार, स्फूर्तिलहरी आणि स्फूर्तिनिनाद हे तीन संग्रह, आणि त्यानंतर गेल्या तीन वर्षांत लिहिलेल्या कविता, यांतून या संग्रहांतील कवितांची निवड केली आहे. माझ्या पूर्वीच्या संग्रहाप्रमाणेंच याहि संग्रहाकडे महाराष्ट्रीय रसिक आपुलकीनें पाहतील अशी मी आशा करतों.

या संग्रहांतील कवितांची निवड करण्यांत माझे जामात श्री. क. श्री. काळे यांचें बरेंच साहाय्य मला झालें आहे. कवितांच्या अभ्यासाला उपयुक्त अशा विस्तृत टीपा श्री. काळे यांनींच माझ्या विनंतीवरून लिहिल्या आहेत. महाराष्ट्राचे थोर साहित्यिक व माझे मित्र श्री. भाऊसाहेब खांडेकर यांनीं आपल्या विवेचक व रसग्राही प्रस्तावनेची जोड या संग्रहाला दिली आहे. श्री. खांडेकर व श्री. काळे यांनीं आपुलकीनें दिलेल्या साहाय्याबद्दल मी उभयतांचा अत्यंत ऋणी आहें. श्री. खांडेकरांची प्रस्तावना म्हणजे आम्हां उभयतांमधील दीर्घकालीन स्नेहभावाचें प्रतीक आहे असेंच मी मानतों.

चित्रशाळा प्रेसचे व्यवस्थापक श्री. दा. त्र्यं. जोशी व प्रकाशन-विभाग-प्रमुख श्री. दा. पां. रानडे यांनीं हें प्रकाशन हौसेनें स्वीकारून तें आकर्षक स्वरूपांत रसिकांना सादर केल्याबद्दल श्री. जोशी व श्री. रानडे यांचा मी आभारी आहें. माझ्यावर व माझ्या काव्यावर लोभ करणारे विलीन इचलकरंजी संस्थानचे आधिपति कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांच्या पवित्र स्मृतीला सदर संग्रह अर्पण करण्यास श्रीमन्मातोश्री गंगाबाई-साहेब घोरपडे यांनीं आत्मीयतेनें परवानगी दिल्याबद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

सांगली
२१।९।१९५४

काव्यविहारी

माझ्यावर व माझ्या काव्यावर लोभ करणारे

विलीन इचलकरंजी संस्थानचे अधिपति

कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब
घोरपडे

यांच्या पवित्र स्मृतीस सादर समर्पण.

— काव्यविहारी

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## प्रभुचरणीं 

(राग—काफी)

मंगलमय विश्व सकल होउंदे दयाळा ! ॥ ध्रु० ॥

ज्ञानरवी उज्ज्वल कर
उधळूंदे अवनीवर
तिमिरपटल जगतींचें जाउंदे लयाला.

जीवनार्थ या जगांत
खपती जे बंधनांत
लाभूंदे चिरवांछित मुक्तता तयाला.

लय पावो असुरता
नांदूंदे शांतता
तोंवरि जगिं मंगलता येइना यशाला
मंगलमय विश्व सकल होउंदे दयाळा !

दि. १५-११-१९३५

## माझी कविता : : २

[ तुम्ही कविता कशी लिहितां असें मला कोणी कोणी विचारतात. त्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न प्रस्तुत कवितेंत केला आहे. ]

( गझल )

पुसतात मला कोणी, लिहिलीत कशी कविता,
कविता स्फुरते सहजी उद्रेक मनीं होतां.
पूर्वेस उषा हांसे सविता उदया येई
सृष्टींत भरे नवता अंधार लया जाई.
बागेंत कळ्या हंसती फुलतीं सुमनें बघतां
आनंद मनीं दाटे आणि स्फुरते कविता.
बहरांत दिसे शेती रानांत पिकें डुलती
संतुष्ट कृषिक सारे आतूर सुगीसाठीं.
खपतात सदा त्यांचीं हंसरीं वदनें बघतां
उल्हास मनीं उसळे आणि स्फुरते कविता.
गिरिबाज कबूतर घे सहजी गिरक्या गगनीं
इतुक्यांत तया बहिरी झडपोनि नखें हाणी.
अणि दीन पडे खालीं तें दृश्य पुढें येतां
जमती अश्रू नयनीं आणि स्फुरते कविता.
थंडींत उन्हामाजी वाऱ्यांत सदा खपती
मरतात भुकेनें ते राबोनि सदा कष्टी.

ये ऊत विलासांना विपरीत असें बघतां
हो खेद मना भारी आणि स्फुरते कविता.

घेवोनि सर्वे मोठें दळ सज्ज विमानांचें
देशांत दुज्या घुसुनी उन्मत्त असुर नाचे.

उध्वस्त करी खेडीं कळतांच अशी वार्ता
ये त्वेष मना भारी, आणि स्फुरते कविता.

सम्राट महाराजे जगतांत किती असती
त्याहूनि प्रतापी जी विश्वांत वसे शक्ती.

ब्रह्मांड निरोधाचें कर्तृत्व तिचें बघतां
हो नम्र झणी माथा आणि स्फुरते कविता.

पुसतात मला कोणी लिहिलीत कशी कविता,
कविता स्फुरते सहजी उद्रेक मनीं होतां.

दि. ३-१-१९४०.

## सांत्वन : : ३

गाढ अनंतोदरीं
गान निमालें जरी
स्मृतिपटलावरि स्वैर विहरती मधुर गानलहरी.

सृष्टीचें छकुलें
सुमन जरी सुकलें
दरवळलेला परिमल झुलवित ने हृदया वरिवरी.

दिव्य मधुर बाला
हंसणारी चपला
झणिं लोपे परि मागुति विलसे दीप्ती गगनावरी.

दुर्दैवें अपुला
वियोग जरि घडला
तुजविषयींचे तरंग हृदयीं वसतिल चिर सुंदरी '

फेब्रुवारी १९१७

## हृदयाचें गान : : ४

ठेवुनि मस्तक हृदयीं देउनियां श्रवण
ऐक गडे ! ऐक जरा हृदयाचें गान.
पुसशिल मज तान कुठें ? ताल कुठें ? सूर कुठें ?
तान सूर ताल सकल उठतिल त्यांतून
ऐक गडे ! ऐक जरा हृदयाचें गान.

आजवरी मम हृदयीं खेळत जी होती
प्रेममयी ही सखये ! मोहक तव मूर्ती.

हांसत अजि जवळि उभी तुजला पाहून
मोदलहरि सळसळती मम हृदयांतून.

लहरींच्या नर्तनांत उमजुनियां तान
ऐक गडे ! ऐक जरा हृदयाचें गान.

सौख्याच्या तारांचें नाजुकसें जाळें
आहे हृदयीं माझ्या सखये ! विणलेलें.

प्रणयाचा मंद अनिल फिरतां त्यांतून
झंकारांतुनि उमटे अस्फुट मधु गान.

तान सूर ताल सकल त्यांतच मानून
ऐक गडे ! ऐक जरा हृदयाचें गान.

जीं जीं प्रेमल हृदयें असती या जगतीं
आत्मानंदीं रंगुनि सकलही गातातीं.

साथ दुज्या हृदयाची जरि लाभे त्यांना
संगीतांतुनि उठती तानावरि ताना.

थोर भाग्य म्हणुनि तुझा लाभ मला झाला
हृदय दुजें सांपडलें विरही हृदयाला.

नयननिपातें मजला संतत सुखवून
ऐक गडे ! ऐक सदा हृदयाचें गान

सप्टेंबर १९१८

## चिमुकला संसार : : ५

[ मुंबईच्या चाळींतील एक दृश्य ]

वाजुनि गेले अकरा
पोटास्तव खपणारा
कामकरी जन सारा
निघुनि जाय शांतवली चाळ ही जरा.

बाप कचेरीस जाय
गृहकर्मीं गुंग माय
काढुनि हल्केच पाय
ग्यालरींत बालांनीं खेळ मांडिला.

कमला विमला तारी
पटपट जमली सारी
मधुलाही ये हिरिरी
घुसला खेळांत वदे मीही येणार.

तयारीस काय उशिर
पीठ मीठ ये झरझर
कशासही ना कमतर
क्षणार्धांत राहि उभा चिमणा संसार.

शंख शिंपलेच किती
मांडुनि पाटावरती
मानुनि त्या देवमूर्ति
गंधफुलांवाचुनि मधु करित पूजना.

चूल न सरपण कांहीं
सामुग्री पुरि नाहीं
त्यावांचुनि ल्वलाही
पाक सिद्ध होइ, सकल बसति भोजना.

मोदें हांसत खेळत
जेवण असतां भरांत
कमलेला मधु बोलत
" मी नवरा तूं नवरी घास दे मला. "

निर्विकार हृदयांची
जोडी ही दोघांची
लाज तिथें मग कुठची ?
मधु वदतां कमलेनें घास त्या दिला.

ऐशापरि मोदभरें
झालें भोजन सगळें
संपतांच मधु बोले
" तुम्ही निजा मी आतां गस्त घालितों. "

इतुकें वदुनी उठला
करिं घेउनि काठीला
बालशिपाई सजला
गस्त करी परि वरती दिवस तळपतो.
पोरी झोपेंत गुंग
मधुकर निजकार्यदंग

संसारा येइ रंग
" तारे ये इकडे " ही हांक कोठुनी !

उठल्या कमला विमला
करित मधू पोबारा
तारि पळे गेहाला
चिमणा संसार लया जाइ त्याक्षणीं.

सृष्टीचीं गोड फुलें
छकुलीं निष्पाप मुलें
त्यांनीं जें रेखटलें
चित्र किती बहरीचें हें संसाराचें.

ओसरुनी परि शिशुपण
हळू जसें येइ ज्ञान
जग सगळें ये कळून
हेंच मधुर चित्र पुढें पालटतें अमुचें.

गेली ती गोड घडी
आस उठे मनिं वेडी
घ्यावी बाल्यांत उडी
कल्पांतीं गोड काळ कधिं न फिरुनि येणें.

आठवता बाल्य सकल
बाल्याचे गोड खेळ
अश्रुपूर ये खळखळ
सौख्यावरि त्या आतां आशेनें बघणें.

नोव्हेंबर १९१८

## सौंदर्य म्हणजे

६ : :

( जाति–दोहा )

अंगिकारुनी मादकता नटवेगिरिचा नूर
दावित दावित देवोनी हुरळबाजिला जोर
उच्छृंखल बेमानपणें उगाच फडकायाचें
नाहीं हें उद्दिष्ट कधीं जगांत सौंदर्याचें.

कांचपात्र कांठून जशी लाल वारुणी उसळे
जळजळत्या उद्दामपणें आंदोलत फेसाळे
यायोगें आव्हान करी जगास घुटका घ्याया
सुंदरता वारुणी नव्हे जग हैवान कराया.

पावित्र्यानें नमवीतें जें दुनियेला पायीं
जयाभोंवतीं मोहकता अविरत गुंगत राही
फिकट ज्यापुढें तारांचें तेजस्वी ऐश्वर्य
मेल्याला जीवंत करी तेंच खरें सौंदर्य.

दि. १६–७–१९२३

अनुक्रम ७.८.८.७८
विभाग ...
क्रमांक ७२८
नों. दि. २०/५/५८

## मंजुळा : ७

[ जाति–लीलारति ]

विस्तीर्ण वडाच्या दगडी पारावरी
मी बसे एकदां चिंतित कांहीं तरी
कितितरी वडाच्या पारंब्या लोंबती
त्या पारंब्यांची गर्दी झाली किती.
मंजुळा पोरगी कुणबी जातींतली
बांध्यानें नीटस आणि कांळिसावळी
वय तिचें असावें तेरा चवदा तरी
ती पारंबीच्या खेळे झोल्यावरी.
जरतारी पातळ नव्हती ती नेसली
नोहता फुलांचा गजरा वेणीवरी
वर्णही नोहता जरी केतकीपरी
निर्व्याज खुलेंपण हीच तिची माधुरी.
चरणीला लावुनि पांच चार शेरडें
ती मधुनी मधुनी पाही त्यांच्याकडे
गुणगुणे खेडवळ गाणें कांहींतरी
घे खुशाल झोके हलत्या झोल्यावरी.
तिज माहित नव्हतें शहरांतिल चोजले
लाजणें मुरडणें असेल मग कोठलें ?
मी नांव तियेचें पुसिलें जेव्हां तिला
खणखणीत सांगे "मज म्हणती मंजुळा"
मग विचारिलें मी "तुम्हि भावंडें किती"
ती झटकन् सांगे "मी आणी श्रीपती.

शेतांत श्रीपती गेला राखायला
आणिलीं शेरडें मी हीं चारायला.'
बोलुनी एवढें झोके चढवायला
नेटानें लागे भान नुरे मग तिला
ती खुल्या दिलानें झोके घे मंजुळा
सानंद कौतुकें बघत उभा मी तिला.
तिज काय वाटलें न कळे परि थांवली
निमिषांत उतरली झोल्यावरुनी तळीं
क्षणभरी मजकडे निर्हेतुक पाहुनी
मंजुळा पळाली क्षणार्धांत तेथुनी.
मजपुढुनी गेली भरकन् वाऱ्यापरी
शेरडांत मिसळुनि जाई निघुनी दुरी
त्या खुलेपणांतिल आठवीत माधुरी
मी कितीवेळ तरि बसलों पारावरी.
ती निर्भय वृत्ती निर्हेतुक पाहणें
तें गोड खुलेपण अमुच्यांमध्यें उणें
येतसें स्वतःचें कृत्रिम जीवित मनीं
कष्टलों परतलों घरास मग तेथुनी.

* * *

हा प्रसंग घडुनी किति वर्षे लोटलीं
भंवतालीं सारी कृत्रिमता माजली
परि मधुनी मधुनी आठवते ती मला
खेड्यांतिल साधी आणि गोड मंजुळा

दि २७-११-१९२९

## जाईच्या फुलास ८ : :

[ उकिरड्याजवळील जाईच्या वेलावर फुललेलें फूल केवळ उकिरड्याच्या सांनिध्यामुळें जगाच्या धिक्कारास पात्र होतें. ]

गोड जाइच्या फुला ! सदा मी जीव तुला वाहिला.
जरी उकिरडयावरी
घाण पडे चौथरी
तया संनिधी परी
वेल जाइचा चढे तयावरी जन्म तुझा जाहला.

उपवनांत कितितरी
जाइफुलें गोजिरीं
सदैव बघतों जरी
तुझ्या गुणांची गोड माधुरी लळा लाविते मला.

जाळाया तुजप्रती
वाहति तुजभोंवतीं
वात विषारी अती
केविलवाणी स्थिति ही माझ्या लोचनिं आणी जला.

हीन जाति यामुळें
भंवतींचे जन खुळे
पतित तुला समजले
देखाव्यानें भुलंदे त्यांना मी नाहीं त्यांतला.

धुंडियलें कितिजरी
न दिसे सौधावरी
नसे राजमंदिरीं
गरिब झोपडींमाजी गवसे सद्गुण जगतांतला.

तुझ्या गुणांच्या बळें
मन माझें ओढलें
तुजवरि तें गुंतलें
जें जडलें तें जडलें नाहीं अन्य मार्ग त्याजला.

सुखवाया तुजप्रती
प्राणांची आहुती
देइन मी संप्रती
पर्वा नाहीं जरी जगानें धिक्कारियलें मला

गोड जाइच्या फुला ! सदा हा जीव तुला वाहिला

दि २१-८-१९२७

# खार आणि घार

९ : :

(जाति–दोहा)

हांसत होती चैत्राची प्रशांत एक सकाळ
नाचत होती सूर्याचीं किरणें रानोमाळ
फांदीवरती लिंबाच्या पळुनी खेळे खार
नाचूंदे अटकाव तिला कोण कसा करणार
सरत्या फाल्गुन मासाचें कडक ऊन्ह तापून
गेलीं होतीं सुकलेलीं पानें पार गळून
फुटली होती झाडांना चैत्रपालवी गोड
कवळ्या पानांनीं फुललें लिंबाऱ्याचें खोड.
टोंकाकडच्या फांदीला मानुनियां मैदान
धांवत होती खारोटी दृश्य दिसे तें छान.
बागडतो बेभानपणें अहा चिमुकला जीव
विधिघटनेची परि व्हावी कशी तया जाणीव.
फांदीवरती पाहोनी बागडणारी खार
झाडाभंवतीं आशेनें घिरट्या घाली घार.
वाऱ्यावरती फिरतांना नजर रोखुनी नीट
किरण साधुनी झडपावें म्हणुनी पाही वाट
झाडावरल्या जीवाला ही नव्हती जाणीव
आशंकेनें परि माझा उडुनी गेला जीव
सोसाट्यानें ये खालीं तीरासम ती घार
फांदीवरुनी एक उठे अस्फुटसा चीत्कार.

जीव चिमुकला झडपोनी पार उडाली घार
गालावरुनी ओघळली माझ्या अश्रूधार
आर्तांचे चीत्कार किती जाती रोज विरून
आक्रंदन परि दुबळ्यांचें जगीं ऐकितो कोण?

* * *

असेल कोणी या जगतीं घारीचाही काळ
तोहि तिला झडपील असा भरुनी येतां वेळ
जींव चिमुकला आज परी करुनी मातीमोल
विजयी भटके आकाशीं घार मात्र बेताल.

दि. १०-३-१९३४

## सदानंद : : १०

( जाति–मोहिनी )

पश्चिमेस बुधगांवाच्या वाट एक जाते
विस्तरलीं दो बाजूंला जिच्या रुक्ष शेतें

मधुनि मधुनि निवडुंगाचे उंचसे डवंगे
डोलतात शेताकांठीं वायुचिया संगें.

पाहतांच त्यांतिल एका डवंग्यास हाय!
दाटतात अश्रू नयनीं हृदय विकल होय.

त्या तळींच कांट्यांखालीं दगड ढेकळांत
सदानंद निजला माझा काळझोंप घेत.

तीन मास नाहीं पुरता राहिला जगांत
सदानंद नामें होई तेवढ्यांत ख्यात.

गोड बाललीला त्याच्या बघुनियां मनाला
जन्मजात नैराश्याचा अल्प विसर झाला.

सदानंद आनंदाचा गमे मला ठेवा
क्रूर हेतु अदृष्टाचा परि कसा कळावा?

ये 'विसर्प' व्याधी न्याया काळदूत त्याला
सदानंद माझा त्यानें हाय! हिरुनि नेला.

काळरात्र आजहि मजला हाय! आठवे ती
खिन्नवदन बसलों होतों त्याचिया सभोंतीं.

झांपडिनें मिटले डोळे श्वास क्षीण चाले
तयावरी खिळले अमुचे अश्रुपूर्ण डोळे.

एक दोन अचके बसले क्षीण शरीराला
विझुनि जाय प्राणज्योती बाळ थंड झाला.

हंबरडा फोडी माता आठवूनि चाळे
आणि तिच्या मांडीवरती प्रेत हाय ! लोळे.

ओढियलें मृत बाळाला मी कठोर हातें
शोकभरें नयनांतूनी अश्रुपूर लोटे.

परि कठोर दगडाहूनी करुनियां मनासी
गुंडाळुनि वसनीं बाळा धरियलें उरासीं.

रात्र गाढ अंधाराची पसरली भयाण
काळरात्रि ऐशा नेला बाळ घरांतून.

मार्ग शून्य होता, नाहीं भेटलें कुणीही
घुवड मात्र घूत्कारानें मधुनि हांक देई.

गांववेस ओलांडूनी तीन बाभळींचें
शेत येइ गेलों कांहीं दूर आंत त्याचे.

खाच एक खणुनी तेथें दगड ढेकळांत
'सदानंद' जड हातांनीं ठेविला तियेंत.

लोटितांच बाळावरती दगड आणि माती
किती आग भडके हृदयीं नको कल्पना ती.

शून्य हृदय झालें जेव्हां परतलों घरास
मृत्तिकेस अर्पुनि माझ्या गुणी बालकास.

हाय ! मला स्मरती त्याचे सदा गोड चाळे
आठवतां अश्रूधारा वर्षतात डोळे.

बहुत काळ गेला तरिही जखम अंतरींची
आजवरी नाहीं बुजली कधिं न बुजायाची.

अजुनि कधींकाळीं जातां सहज त्या पथानें
स्मरण येइ मानस जातें भरुनि खिन्नतेनें.

दोन अश्रु गळती आणी वदत मी मनांत
सदानंद निजला येथें काळझोंप घेत.

दि. ११–५–१९२९

## कृष्णेच्या पुलावरून : : ११

[ सांगली येथील आयर्विन पुलावर उभा राहिलों असतांना मनांत आलेल्या विचारांवर प्रस्तुत कविता आधारली आहे. ]

( जाति–भूपतिवैभव. )

ही वरुनी वाहत आली कृष्णाबाई
ही अशीच येथुनि खालीं वाहत जाई ॥ ध्रु० ॥

कितिकाळ अशी वाहते
किति संक्रमणें पाहते
उच्छेद किती ऐकते
हें अज्ञ मानवा कुणा ठाउकें नाहीं.

पूर्वींच्या काळांतलें
साम्राज्य भरभराटलें
हिंदुत्व इथें गाजलें
ऐकिले विजयचौघडे हिनें तेव्हांही.

परि पुढें कलह माजला
लागली उतरती कळा
" हैदोस " इथें गाजला
पाहिली हिनें वैभवीं विजापुरशाही.

साम्राज्यमदें माजले
परि शिवरायाच्या बळें
ते अविंधही लोळले
देखतां हिच्या गरजले मराठेभाई.

हिंदवी स्वराज्यांतले
रणमर्द हिनें पाहिले
रिपुरक्तानें नाहले
न्हाणिलें तया वीरांस हिनें तेव्हांही.

ब्राह्मणी राज्य जाहलें
विपरीत यादवीमुळें
शतकांत तेंहि लोपलें
हांसली विषादें तेव्हां कृष्णामाई.

परकीय युरोपांतलें
मग येथें फोंफावलें
ऐश्वर्य तयांचें झुलें
साम्राज्य इंग्रजी तेंहि लयाला जाई.

तो काळ जुना बदलला
प्रगतिचा मनू पातला
सरसावे यांत्रिककला
नच कौतुक वाटे हिला तयाचें कांहीं.

हिजवरी भला थोरला
हा पूल नवा बांधिला
किति ऐटीनें उघडिला
तुच्छत्वें हांसत तयाकडे ही पाही.

क्षणभंगुर सत्ताबळें
उन्माद चढे त्यामुळें
नाचतसूं आम्ही खुळे
बेगुमान परि ही अशीच वाहत राही.

किति साम्राज्यें उलथलीं
किति नवीं उभीं राहिलीं
स्थिति सर्व हिनें पाहिलीं
परि कधीं तिळ हिनें पर्वा केली नाहीं.

अज्ञात अनंतांतुनी
ये मागुनि ही कोठुनी
वाहते तशी वाहुनी
अज्ञात अनंतांमधें लीन ही होई.

ही अशीच येथुनि खालीं वाहत जाई.

दि. २।७।१९३०

## शिकार : : १२

बांधावरती दाट माजल्या केकताडिच्या मधून्
सैरावैरा रानसशाचें पोर पळे बावरून्. ॥ ध्रु० ॥

चढुनी आला होता वरती आकाशीं भास्कर
तापत होतें ऊन्ह रखरखी रानमाळावर.

असल्या वेळीं कुणी शिकारी शिकार खेळायला
तल्लख कुतरे दोन घेउनी माळांवरि पातला.

जणुं घारीची नजर तयाची कुतरेही त्यापरी
उठेल सावज म्हणुनी भटकत होते माळावरी.

बांधावर खसपस कांहीं वाजलें
हलुं केकताडिचें पातें हाललें
तीराच्या वेगें कुतरे धावले

पाहत होता मौज शिकारी दुरुन ढेपणीवरून
सैरावैरा रानसशाचें पोर पळे बावरून्.

काळदूत ते अधीर होउनि धांवति बांधावरी
तयांस वाटे लपलें येथें सावज कांहींतरी

आणिक होतें खरेंच गोंडस पोर सशाचें तिथें
केकताडिच्या फडांत लपुनी भेदरुनी पाहतें.

चाहुल घेउनि फडांत घुसले कुतरे दोन्हीकडून्
थरथर कांपे पोर तयांना मागें पुढती बघून्.

भेसूर मुसकुटें त्यांचीं पाहुनी
नजरेंत क्रूरता भरली जाणुनी
सोडिला ठाव हृदयानें त्याक्षणीं

नजर चुकवुनी हळूच निसटे केकताडिच्या मधून्
सैरावैरा रानसशाचें पोर पळे बावरून्.

नाहीं दुसरें प्यार कुणाला जगिं या प्राणाहुनी
दीन सशाचें पोर सारखें पळे जीव घेउनी.

मधेंच राहे लपुनि दाखवी मधेंच हुलकावणी
होलपटीनें कुतरे गेले क्षणभर भांबावुनी.

किती वेळ परि जीव चिमुकला पळेल काळापुढें ?
गात्रें शिणतां हतबल होउनि धरणीवरती पडे.

विक्राळ दूत काळाचे पातले
पकडींत तयांच्या दुबळें तळमळे
मृदु शरिरीं त्याच्या घुसले झणिं सुळे

पोर बिचारें मरुनी गेलें उन्हांमधें तडफडून्
विजयश्रीची परि आरोळी उठे ढेपणीवरून्.

दि. ३।७।१९३२

## दोन पतंग : : १२

[ पंतगाचा खेळ आपण नेहमीं पाहतों. या खेळांत दोन पतंगांना एकमेकांवर सोडण्याची लहर पतंग उडविणारांना केव्हां केव्हां येते. दोन पतंग मग एकमेकांवर तुटून पडतात, व फाटून भरकटून जातात. पतंग खेळणारे मात्र नामानिराळेच ! ]

( चाल–सुप्रभाति सूर्य निघे. )

गगनाच्या पोकळींत भिरभिर वारा वाहे
आनंदुनि मुक्तमनें पक्षीगण उडताहे
वाऱ्यावरि उडणारे दोन सुबकसे पतंग
विहरोनी भूषविती गगनाचें अंतरंग.

क्षण निश्चल राहोनी क्षणिं घेती गोड डोल
विसरोनि देहभान मारिति गिरक्या खुशाल
जणुं तरळति आकाशीं मेघखंड पांढुरके
नील जलावरि अथवा पोहति सुंदर बदकें.

लाडावुनि ते पतंग लागति जवळीं याया
प्रेमळ बांधव झाले उत्सुक जणुं भेटाया
परि अवचित कां नकळे सरले ते दूरदूर
खेळविती त्यांलागी खास कुणी सूत्रधार.

दिसति पहा मैदानीं युवक उभे कोण दोन
तेच निमुट चाळविती सगळीं सूत्रें तिथून
रोधक ते लहरीनें फिरवितील जेविं हात
त्या तालावरि गगनीं हे पतंग नाचतात.

निमिषमात्र मनिं माझ्या असले उठले तरंग
तेवढ्यांत गगनाचें खळबळलें अंतरंग.
सोसाट्यानें उठला वाऱ्याचा प्रबल झोत
दाहि दिशा व्यापोनी घुमघुम आवाज उठत.

बघुनी हें बहु झाला हर्ष सूत्रचालकांस
कोणाचें संकट जगिं खेळ गमतसे कुणांस
जाणुनियां कलहाला हाच खरा उचित काळ
चेतवुनी ते पतंग सोडुनि दिधले खुशाल.

होउनि बेभान उभय झगडाया सज्ज होति
धावधावुनी प्रहार अन्योन्यावरि करिती
लढतां लढतां झाले छिन्नभिन्न दोघेही
वेडेपण तें बघुनी वारा हांसत राही.

भांडुनिया आपसांत ते पतंग अज्ञानी
न कळे कोठें गेले वाऱ्यावरि भरकटुनी
बराचवेळ उचमळुनी येत एक मनिं विचार
कलहाचे चेतक जगिं दुष्ट किती सूत्रधार !

दि. १३।६।१९३५

## माधुरी : : १४

[ राजवाड्याच्या सौधावर उभ्या राहिलेल्या सुंदर तरुणीस पाहून. ]

( जाति–सूर्यकला )

सुंदर नृपमंदिर,
तयाच्या सुंदर सौधावरी
रमणी कोणीतरी
उभी ही चारुमूर्ति हांसरी.

शुक्राची चांदणी
उतरली जणुं अस्मानांतुनी
सौधाच्या कोंदणीं
जणूं ही लखलखते हिरकणी.

सोनसळी पातळ
शोभवी बांधा सडपातळ
नजर खुली प्रेमळ
आणखी वदनकांति निर्मळ.

वेणी जरि गुंफिली
परी ही चुकार बट त्यांतली
गालावर पातली
लोपवी गालावरची खळी.

मौक्तिकसर एकला
रुळोनी स्कंधीं खुलवी गळा
जोडिदार दूसरा
कुणी या अधरावरि स्थापिला.

नाजुक तनु गोजिरी
वनींची लता जणूं लाजरी
फूल तिचें ज्यापरी
तशी ही खुलते मुखमाधुरी.
गात्रावरि चारुता
कपोलीं सुरम्य आरक्तता
नयनीं तेजाळता
विराजे वदनावरि दिव्यता.
अवतरली भूवरी
विधीची मूर्त कलाचातुरी
अथवा सौधावरी
हंसे ही विश्रांतिल माधुरी.

दि. १९।५।१९३१

## जगाचा न्याय : : १५

[ राग–मांड ]

हा न्याय असे जगताचा ॥ ध्रु० ॥
रात्रंदिन ज्यांनीं भ्यावें
पदतळीं चुरडुनी जावें
त्यांच्याच कपाळीं यावें
उन्मत्त करुनि अन्याय उरावरि खुशाल नाचायाचा.

मार्गावरि ठायींठायीं
हिंडतात गोगलगायी
जग तुडवी त्यांना पायीं
परि नाग विषारी फणा काढुनी डौलानें जायाचा.

चिमुकलीं पांखरें सारीं
पारवळें गरिब बिचारीं
गांजिती तयांस शिकारी
बेगुमान बहिरी फिरे लुटारू तो गगनप्रांतीचा.

मेंढरें वासरें गाई
कुणि त्राता ज्यांना नाहीं
कापिती अशांस कसाई
जंगलांत घुसुनी कुणि उतरीना नक्षा वनराजाचा.

भिजुनियां चिंब घामानें
खपुनि जे पिकविती रानें
ते मरती करभारानें
अत्तरी दिवे जाळितो छोकरा ऐदी श्रीमंताचा.

किति मजूर गिरणींमधले
राबतां राबतां मेले
तळमळती त्यांची पोरें
मोटारी उडवित फिरे मिजासी परि मालक गिरणीचा.

तोऱ्यांत बलिष्ठ असावें
गरिबांनीं फुकट मरावें
मत्तांनीं त्यां तुडवावें
मामला चालला असाच मागें पुढती चालायाचा
हा न्याय असे जगताचा.

दि. २७।२।१९३०

## मोटेवरचें गाणें : : १६

प्रभात-कालीं मोटवणावरि कोण गीत गाई.
साथ ही कोण त्यास देई, चला ती बघुंया नवलाई

भिराभिरताहे शीत आणखी मंद मंद वारा
हर्षला विहगवृंद सारा, फुलोरा खुलला हंसणारा.

अनुपम शोभा दावितसे ही आम्रवृक्षराजी
फुलांची नवाळ जी ताजी लुटुनि ती उडति भृंगराजी.

विहीर रेखिव तियेंत भरलें निवळशंख पाणी
माचाड उंच वरुनी आंत जणुं बघतें वाकोनी.

धाव उतरती पाट चालला तिजला खेटोनी
पिकाला जाणारें पाणी खळखळा वाहे त्यांतूनी.

झरझर चाले मोट मिळेना उसंत मुळिं तिजला
विसावा कुठला बैलांला ? तयांच्या तरुण मालकाला.

अठरा एकोणीस असावीं उमर जवानाची
काय ही ऐट पचंगीची खादिच्या आखुड कुडत्याची.

रुंदट छातीवरती लोळे ताइत डौलानें
गातसे सुरावरी गाणें, चालली मोट झपाट्यानें.

सुरेल गाई गीत तयाचा गोड किती साद
सभोंतीं दूर घुमे नाद, उठे मग सुंदर पडसाद.

गोंडस रेखिव मुळीं नोहती रचना गाण्याची
लूट जरि कोमल भावांची कशाला पर्वा रचनेची ?

गाणें होतें राघूसाठीं झुरत्या मैनेचें
भावड्या अल्लड तरुणीचें तियेच्या पहिल्या प्रीतीचें.

इष्काच्या गाण्यांत रंगला एकतानतेनें
गातसे हौसेहौसेनें रंगली सृष्टी गानानें.

गीतांमाजी सूर मिसळुनी चाक करी साथ
रंगुनी सुरेल गीतांत, नाचतें पाणी पाटांत.

रंगुनिया लागला उसाचा फड डोलायाला
लागलें वेड मक्याणाला तुऱ्यांचा नाच सुरू झाला.

गीताची मोहिनी यापरी सृष्टीवरि पडली
वृत्ति मम रंगुनियां गेली, मनाची तन्मयता झाली.

किती वेळ ऐकिलें सारखें वाटे ऐकावें
गोड या गानीं गुंगावें, जगाला विसरुनियां जावें.

दि. ११।३।१९३१

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## पाळीव पोपटास १७

[ एक पाळलेला पोपट पिंजऱ्यांत कोंडलेला असून मालकानें डाळिंबाचे दाणे त्यास खाण्यासाठीं पिंजऱ्यांतच त्याच्यापुढें ठेविलेले आहेत या कल्पनेवर प्रस्तुत कविता आधारली आहे. ]

( चाल—सबसे रामभजन या चालीसारखी )

हे डाळिंबाचे दाणे वेड्या! घात तुझा करिती
कवटी तूं कवठावरली
फोडिलीस एका काळीं
ती चोंच आज बोथटली
करितोस गुजारा धनी टाकितो त्या तुकड्यांवरती.
मालक तव हौशी फार
करि माया जरि अनिवार
कुरवाळी वारंवार
तूं पाळिव पोपट त्याचा म्हणुनी तुच्छ तुला गणिती.
चैनींत घेत गिरक्यांसी
स्वच्छंदें वनिं फिरलासी
गगनांत स्वैर उडलासी
ते स्वातंत्र्याचे दिन सोन्याचे आठव तूं चित्तीं.
चाहिल तें झाड वघावें
त्यावरी स्वैर उतरावें
फळ दिसेल तें फोडावें
मग उडुनी जावें खुशाल असली तेव्हांची रीती.

कितितरी फळें पाडाचीं
चोंचीनें फोडायाचीं
ही लीला तव नित्याची
पिंजऱ्यांत अडकुनि आयुष्याची झाली तव माती.

पूर्वीची हिंमत गेली
स्वत्वाची ओळख नुरली
नादान वृत्ति तव झाली
कारितोस धन्याची ‘ हांजी हांजी ’ तूं पोटासाठीं.

येतांच धनी नाचावें
नाचत त्या सत्कारावें
तो वदेल तें वोलावें
तेंव्हांच टाकितो मालक दाणे असले तुजपुढती.

हे दाणे दिसती छान
जरि लाल आणि रसपूर्ण
त्याज्य ते विषासम जाण
पिंजऱ्यांत मिळती म्हणुनि तयांची मुळें नाहीं महती.

हा अधःपात तव झाला
डाळिंबचि कारण याला
भुलनियां अशा तुकड्यांला
पिंजऱ्यांत मेले किती अभागी पोपट या जगतीं
हे डाळिंबाचे दाणे वेड्या ! घात तुझा करिती.

दि. २६–११–१९२९

# मैना : : १८

[ राजवाड्यांतील रंगमहालांत सोनेरी तारांच्या पिंजऱ्यांत कोंडलेली एक अभागी मैना पाहून. ]

राग—यमनकल्याण

पिंजऱ्यांत झुरते मैना.
कुणि सोडीना, मन राहीना. ॥ ध्रु० ॥
सोन्याच्या सुंदर तारांनीं गुंफिला
मोत्यांची झालर घोंसदार त्याजला
बहुमोल पिंजरा महालांत टांगला
नव रंगमहालीं जरी जाहली मैनेची स्थापना.
कधिं जवळीं येई प्रासादाचा धनी
अति लोभ दाखवी प्रेमें गोंजारुनी
सुखवाया तिजला झटतो रात्रंदिनीं
बसतसे पंजरीं खिन्न सदा ही तयाकडे पाहिना.
मोत्यांचा चारा सदा पुढें ठेवुनी
खावया आर्जवें करिते दासी कुणी
रिझवाया झटते कुणी मधुरभाषिणी
बोले न कुणाशीं तिळही मैना चाराही खाइना.
उद्यान बहरलें प्रासादाभोंवतीं
त्यांमधें तरुलता आनंदें डोलती
किति राघूमैना स्वच्छंदें विहरती
हें बघुनि कोंडल्या जीवालागीं होति अमित यातना.

सुप्रभातकालीं भिरभिर वाऱ्यावरी
डौलांत पांखरें तरंगती कितितरी
हें बघुनी मैना तडफडते अंतरीं
कढतसे मानसीं सदा बघोनी भंवतींच्या बंधना.

दिनमणी तळपतो तेजस्वी अंबरीं
उत्साह उधळितो साऱ्या जगतावरी
अंधार माजला मैनेच्या अंतरीं
गाळिते आसवें बापुडवाणी विटली या जीवना.

सुखभोग जगींचे सज्ज हिच्या भोंवतें
इंद्राचें वैभव पदीं हिच्या लोळतें
पंजरीं बिचारी परि अश्रू ढाळिते
परि मर्म यांतलें कळलें नाहीं कधिं भंवतींच्या कुणा
पिंजऱ्यांत झुरते मैना, कुणि सोडीना मन राहीना.

दि. २७–२–१९३२

## माझें जन्मग्राम : : १९

( जाति—पादाकुलक )

मम गेहाच्या आगाशींतुनि
आसमंत किति दिसे दूरवर
पश्चिमेस हा दिसे आडवा
दानोळीचा निळसर डोंगर.

कोसावर पूर्वेस तयाच्या
कृष्णाकांठीं निसर्गसुंदर
तरुराजीनें वेष्टित शोभे
मदीय जन्मग्राम हरीपुर.

तयावरुनि हा वाहत येई
मना तोषवी पश्चिमवारा
होतां सुखद स्पर्श तयाचा
पूर्वकाल ये मनांत सारा.

बालपणीं माझिया ग्राम हें
गजबजलेलें असे सदोदित
गेहांगेहांमधें भरोनी
कृषीसंपदा होती नांदत.

आसमंत पूर्वेस शोभवी
चिंचबनांतिल गणेशमंदिर
संगमनाथाचिया देउळीं
घुमला घंटानाद मनोहर.

हिंडत होतीं पुष्ट खिलारें
नदीतीरच्या कुरणांमधुनी
कृष्णातटिचें तेज आगळें
सकल जनांच्या दिसलें वदनीं.
विद्याधनसंपन्न गांव हें
सुखांत कांहीं काळ नांदलें
कालगतीनें परी तयाचें
वैभव सारें लयास गेलें.
आज माझिया जन्मग्रामा
आली जी अवदशा अमंगळ
पाहतात सोडीत उसासे
घाटावरले उदास पिंपळ.
नष्ट होउनी अगणित खेडीं
नगरांचा वाढला पसारा
शेतकरी कंगाल बने हा
परवशतेचा प्रभाव सारा.
कठिण काळ तो सरुनी सांप्रत
प्राप्त होइ स्वातंत्र्य भारता
पिळुनी खेडीं नगर भरावें
भेदभाव हा नुरला आतां.
गर्द तरूंच्या छायेमाजीं
प्रसन्न जन्मग्राम दिसावें
तेंच भारता भूषण व्हावें
हेंच वांछितों जीवेंभावें.

दि. २१-५-१९४९

## उंबरांतले किडे : : २०

[ उंबरांतल्या किड्यांना आपलें उंबर म्हणजेच सर्व जग असें वाटत असतें. अफाट विश्वाची कल्पना त्या दुबळ्यांना कोठून असणार ! ]

( जाति–पद्मिनी )

उंबरांत बांधुनि वाडे, उंबरीं नांदती किडे. ॥ ध्रु० ॥
राजा झाला कुणी एकला
दुजा गाजवी प्रधानकीला
तिसरा जागे रखवालीला
प्रजा बनोनी अंवते भंवते असंख्य जमले किडे.

त्यांतच होते वाणी उदमी
वैद्य आणखी वकील नामी
बाह्य जगाला परी निकामी
तिथेंच जगती तिथेंच मरती क्रम हा ऐसा घडे.

कूपांमाजीं बेडुक वसती
त्या कूपाला विश्व मानिती
या कीटांची असली वृत्ति
अफाट भंवतीं विश्व पसरलें नच बघती त्याकडे.

किति शतकांच्या जुन्या कल्पना
धार्मिकतेच्या फोल वल्गना
हीच जयांची धर्मभावना
असे धर्ममार्तंड उंबरीं किततरि हाते बडे.

खाण्यासाठीं जन्मा यावें
खातां खातां मरुनी जावें
तत्त्व पाळिती जीवेंभावें
फुकट खाउनी राष्ट्रें बुडती नुमजाति परि बापुडे.

'राजा विष्णूचा अवतार'
या तत्त्वाची महती फार
किडे घोकिती वारंवार
आणि उंबरीं राजवटीचे वाजविती चौघडे.

लाथेसरशीं उंबर उडतें
सहजी पायीं चुरडुनि जातें
विश्व त्यांतलें क्षणांत मरतें
परी उंबरा विश्व समजती अज्ञानी बापुडे.

प्रगतीमार्गावरि जग धांवे
म्हणुनि जगाच्यामागें जावें
जगतासंगें नवें बनावें
प्रगतितत्त्व हें या हतभागी मूर्खांना वावडें.

असें विश्व हें ज्यांचें त्यांना
उंबरांतल्या घुंघुरट्यांना
असो सदा लखलाभ किड्यांना
अशा विचारें तुच्छत्वें जग हंसे बघुनि यांकडे
उंबरांत बांधुनि वाडे, उंबरीं नांदती किडे.

दि. २२-११-१९२९

## तुझा देव : : २१

(राग–भैरव)

नीरांजन ओवाळाया कां इतुकी घाई? ॥ ध्रु० ॥

दगड एक वाटेवरला
मानुनि तूं देव तयाला
सिंहासन दिधलें त्याला
फत्तरासि म्हणुनि फुकाची देवकळा येई.

देव खरा आहे कोठें?
उमगलें न कधिंही तूंतें
बांधिलेंस मंदिर मोठें
उंच उंच शिखर जयाचें गगनिं ठाव घेई.

मंदिर तें जीर्ण जहालें
सकल चिरे निखळुनि गेले
कोसळेल केव्हां न कळे
देवळांत देव भयानें हादरूनि जाई.

देव तुझा दुबळा असला
शोभे न देवपण त्याला
म्हणुनिं उचित या समयाला
प्रखर तेज दावुनि जगता तूंचि देव होई.

त्यागशील विक्रमवंत
तोचि खरा देव जगांत
तूं होई तसा भगवंत
लोळतील जगिंचे सारे देव तुझ्या पायीं
नीरांजन ओवाळाया कां इतुकी घाई ?

दि. १८-६-१९३८

# शंकर आणि नंदी : : २२

(जाति–पादाकुलक)

सहज एकदां कैलासावर
सती पार्वती आणिक शंकर
प्रासादाच्या सौधावरती
मजेंत सारीपाट खेळती.

झळकत होत्या रम्य पटावर
रत्नखचित् नव नरदा सुंदर
सेवक नंदी जवळ राहुनी
खेळ पाहतो आतुर नयनीं.

खेळा चढला रंग भराभर
दंग पार्वती आणिक शंकर
वेळ उलटली परी शिवाची
सरशी होई सहज उमेची.

डाव लागतां ओहोटीला
कैलासाचा नाथ खवळला
हातीं थरथर कांपति फासे
विजयोन्मादें गिरिजा हासे.

क्रोधभरें मग शंकर खेळे
उधळुनि पडले फांसे सगळे
एक पटावरि फासा घुसुनी
दूर सोंगटी जाय उडोनी.

ठेवावी ती कुठें पटावर
यास्तव माजे वाद भयंकर
कांहीं केल्या वाद मिटेना
शंकर गौरी कुणी हटेना.

वाद ऐकुनी बावरलेला
नंदी होता थिजुनी बसला
वदले दोघे तयालागुनी
सत्य काय तें सांग या क्षणीं.

सत्य उमेचें असे बोलणें
मनीं जाणलें जरि नंदीनें
समय पाहुनी सांगे सत्वर
' शिव वदला तें असें बरोबर. '

नंदीची ही इमानदारी
बघुनि हांसला शंकर भारी
परी कोपली उमा मानिनी
क्रोधें वदली नंदीलागुनि.

" तोंडपुजेचा धंदा करिसी
स्वार्थासाठीं सत्य लपविसी
मूढा ! वदसी असत्य वाणी
घेई माझा शाप या क्षणीं.

वंश मंदमति होइल तुमचा
जाइल झडुनी तुमची वाचा
आणिक तुमच्या बसेल खडतर
जन्मोजन्मीं जूं मानेवर."

* * *

शाप सतीचा फळासि आला
प्रत्यय त्याचा दिसे आजला
घेउनि अवजड जूं मानेवर
अगणित नंदी फिरती जगभर.

दि. ३-९-१९३६

## उत्तरेकडे : : २३

[ उत्तर हिंदुस्थानांतील स्फूर्तिदायक स्थळें पाहण्याच्या अति उत्कट इच्छेंतून प्रस्तुत कवितेची निर्मिती झाली आहे ]

महाराष्ट्रदेशांत वास मज जन्मापासुनि घडे
लक्ष लागलें सांप्रत माझें सतत उत्तरेकडे. ॥ध्रु०॥

मानदंड वदती पृथिविचा
भव्य हिमालय धवल यशाचा
वाटे घडुनी वास तेथचा
रोज चढावे गिरिचे दुर्गम बर्फाच्छादित कडे.

अथांग गंगायमुना यांनीं
समृद्ध केली फळाफुलांनीं
सस्यशामला ती भू बघुनी
आनंदावे लोचन ऐसा छंद जिवाला जडे.

इतिहासीं जें गाजें अविरत
राष्ट्राचें रणतीर्थ पानिपत
स्वैर मनानें त्यावरि भटकत
स्वातंत्र्याचीं गाणीं गावीं हें मजला आवडे.

तोडायास्तव दास्यबंधना
जिथें झुंजला प्रतापराणा
बघुनी त्या रजपूतस्थाना
स्फूर्ति तेथली ध्यावी वाटे परि हें केव्हां घडे ?

शीखांची विक्रमभू बघुनी
भटकत गंगातीरावरुनी
गांठावा बंगाल तेथुनी
ऐकावे वाटतें तेथले क्रांतीचे चौघडे.

सह्यगिरीच्या शिखरांमधुनी
स्वातंत्र्याचे निनाद घुमवुनि
स्फूर्ति उधळली शिवरायांनीं
मर्द महाराष्ट्राची भूवर अखंड नौबद झडे.

जन्म महाराष्ट्रांत लाभला
इथें स्फूर्तिचा प्यालों पेला
म्हणुनि मायभू प्रिय अति मजला
परि उत्सुक मी उल्लंघाया सातपुड्याचे कडे
लक्ष लागलें सांप्रत माझें सतत उत्तरेकडे

दि. २६–१०–१९४२

## पायरीवर : : २४

(राग—पहाडी)

किति वेळ तिष्ठतो येथें अजुनि कां बंद हें द्वार. ॥ध्रु०॥

विस्तीर्ण किती आवार
भंवतालीं तट चौफेर
दरवाजा संमुख थोर
लाविला आंतुनी कोणी केधवां खुला होणार ?

या उंच तटाच्या आंत
चैनींत कितिक वसतात
झगझगाट दिसतो आंत
आम्हींच मात्र अंधारीं रखडावें कां बाहेर ?

कधिं थंड झोंबतो वारा
कधिं चटके देत उन्हाळा
उघडयावरि आम्हां थारा
आंतल्या प्रांगणीं आम्हां शिरकाव कधीं मिळणार ?

वसती जे आंत तयांसी
मिष्टान्न मिळे खायासी
बाहेरिल जन उपवासी
विषमता क्रूर ही भारी केधवां नष्ट होणार ?

पायरीवरी या बसुनी
गाइलीं रोज गाऱ्हाणीं
ऐकिलीं न परि तीं कोणी
याचना करुनि कोणाची जगिं दाद कोण घेणार ?
बंद जें द्वार हें पुढचें
आंतुनी न उघडायाचें
करुनियां यत्न निकराचे
आम्हींच पुढुनि फोडावें तेधवां खुलें होणार
किति वेळ तिष्ठतो येथें अजुनि कां बंद हें द्वार ?

दि. ७–२–१९४३

## वीरमाता : : २५

[ इ. स. १९४२ सालच्या ‘ चलेजाव ’ आंदोलनाच्या वेळचें सह्याद्रीच्या खोऱ्यांतील एक दृश्य. ]

( जाति–भूपतिवैभव )

बाहेर पसरली रात्र घोर अंधारी
थंडीचा कडका तशांत होता भारी
अति जीर्ण खोपटांमधें वाकळेखालीं
कुणि एक माउली जागृत होती पडली.

बाहेर कुणीसे हळुंच बोललें “ आई ”
तिज ओळख पटली उठली ती लवलाही
पेटतांच पणती प्रकाश पडला संथ
ती कवाड उघडुनि मुलास घेई आंत.

भरदार तयाची होती कणखर काया
तेजस्वी सात्त्विक भाव दाखवी चर्या
येतांच वीर तो मातेला करि नमन
गहिंवरुनि माउली देई आशीर्वचन.

कुळवंत मराठा निकम तया अभिधान
करित तो आपुली शेतीवर गुजराण
निस्वार्थी बेडर असे तयाची वृत्ती
अंतरीं तयाच्या रुजली देशप्रीती.

उसळल्या तयाच्या प्रबल भावना चित्तीं
अर्पावें जीवन मातृभूमिच्यासाठीं
उसळतां क्रांतिच्या राष्ट्रांमाजीं लहरी
घे उडी संगरीं निवडा वीर ' मुरारी. '

धरपकड जाहली सुरुं झणी चौफेर
जाहला भूमिगत निकम मुरारी वीर
करि संघटनेचें कार्य थोर निष्ठेनें
त्या आश्रय दिधला उदार सह्यगिरीनें.

रात्रींच्या समयीं बघुनि सुरक्षिततेला
कधिंकधीं येउनी भेटे निज मातेला
सत्तेच्या घरची चटणी–भाकर खाई
त्यापरी आज तो आला होता गेहीं.

मग लगबग करुनी एका थाळीमाजीं
दे प्रेमळ माता तयास भाकर भाजी
मोडोनी तुकडा जंवर घालि तो वदनीं
आवाज शिट्यांचे कर्कश पडले कानीं.

दे सारुनि थाळी उठला झडकरि वीर
हो तीरासम तो अंधारांत पसार
इतुक्यांत पातली पोलिससेना जवळीं
रोखुनी संगिनी झोंपडिच्या भंवतालीं.

झोपडींत सेनानायक वेगें घुसला
मातेवरि रोखुनि पिस्तुल गर्जत वदला,
"झणि सांग मुरारी, कोठें आहे बाई,"
ती वदे निश्चयें "मजला ठाउक नाहीं."

अधिकारी गर्जे "इथेंच होता आतां
वद कोठें गेला, न तरी खाशिल लाथा."
ती कठोर नयनीं बघे वदे लवलाही
"तो कुठें मुरारी तुजला सांगत नाहीं."

क्रोधास चढुनि तो क्रूर मत्त अधिकारी
मानेवरि तिचिया निर्दय ठोसा मारी
ये खारट घुटका गळ्यांत, टाकी गिळुनी
थरथरत वदे ती जळजळत्या शब्दांनीं

"सर्वस्व सांडुनी मातृभूमिच्या काजा
अर्पिला असे मी पुत्र मुरारी माझा
तूं खुशाल माझा प्राण हवा तर घेई
बाळाचें नखही दिसावयाचें नाहीं"

* * *

अधिकारी तिथुनी निमुट निघोनी जातां
धरणीवर पडली विकल होउनी माता
दाविलें अतुल जें तेज वीरमातेनें.
पाहिलें सकौतुक हांसत तें रजनीनें

दि. २०-९-१९४६

## देवी चामुंडा : : २६

[ हिंदूंच्या कल्पनेप्रमाणें देवी चामुंडा ही विनाशाची देवता आहे. जगांत वारंवार उद्भवणारीं महायुद्धें हा जगांतिल किल्मिषें जाळण्यासाठीं झालेला देवी चामुंडेचा संचार असतो ही या कवितेची मध्यवर्ती कल्पना आहे. ]

संचारा चामुंडा भूतलीं निघाली. ॥ ध्रु० ॥

नररुधिरें ओष्ठद्वय दिसत लाललाल
स्कंधावरि अति भेसुर रुळत रुंडमाळ
धडधड जळती हातीं पेटत्या मशाली

शिंपोनी रुधिर वरी सज्ज मार्ग सारे.
वाजतात अमित शंख नौबदी नगारे
कर्कश तो नाद घुमे सतत अंतरालीं.

लक्षावधि उडति बाण स्वागतार्थ मार्गीं
कोटि कोटि चंद्रजोति जळति जागजागीं
पसरोनी उग्र गंध धुंद धरा झाली.

तुडवित पदिं मांस रुधिर मार्ग चालतांना
लावितसे चूड अमित भव्य मंदिरांना
मार्गावरि ठायिंठायिं पेटवीत होळी.

धर्म जाति पंथ वंश होति भस्मसात
कृष्णवर्ण धूर चढे गगनमंडळांत
खदखद हांसत पाह दृश्य महाकाली.

वणव्यानें वस्तुजात चाललें जळोनी
भयविव्हल जग बघतें स्तिमित लोचनांनीं
भय कसलें जरि शुभार्थ जननि विश्व जाळी ?

स्वार्थ दंभ सत्तामद विषमता अहंता
जाळाया जगतांतिल निघे जगन्मता
अशुभ काय जरि जगिंचीं पातकें जळालीं.

*  *  *

दग्ध धरेवरि सिंचन पडुनि अमृताचें
या जगतीं नंदनवन गोड फुलायाचें
व्हायाची सृष्टि नवी अतुल विभवशाली.

संचारा चामुंडा भूतलीं निघाली.

दि. २३–८–१९४१

अनुक्रम ७८८४
विभाग
क्रमांक
नों. दि.

## विमान आणि कोंबडा : २७

(जाति–पादाकुलक)

प्रशांत ऐशा एक सकाळीं
घरघर गगनीं ऐकूं आली
अंगणिं येउनि वरी पाहिलें
भिरभिरतें मज विमान दिसलें

फिरे भराभर साऱ्या गगनीं
वाटे मज तें विमान बघुनी
घार जणूं ही विशालदेही
स्वैर हवेवरि भटकत राही.

विमान गिरक्या घेई गरगर
मधेंच तरळे राहुनियां स्थिर
दृश्य दिसे तें अति चेतोहर
घरघर नादें भरलें अंबर.

समोर माझ्या खुल्या अंगणीं
एक कोंबडा आला कुठुनी
कीटक आणिक कण धान्याचे
हिंडत मधुनी मधुनी वेचे.

तयें ऐकिली वरली घरघर
उत्सुकतेनें पाहियलें वर
उंच तरळतें विमान बघुनी
ईर्षा उपजे अंतःकरणीं.

हवेंत भिरभिर उंच उडावें
वाऱ्यावरती झोके घ्यावे
असा करावा विक्रम कांहीं
आकांक्षा मनि उसळी घेई.

नजर रोखुनी गगनावरती
एकवटोनी सारी शक्ती
पंख फडकुनी आवेशानें
झेंप घेतली उंच तयानें.

निमिषमात्र तो हवेंत दिसला
लगेंच लागे उतरायाला
उतरे पडक्या भिंतीवरती
उड्डाणाची झाली पूर्ती.

परी कोंबडा समजे अंतरिं
स्वयें मारिली गरुडभरारी
फुगवुनि छाती अभिमानानें
आरवला बेहोषपणानें.

हांसत मग मी वरी पाहिलें
निळेंभुरें आकाश पसरलें.
करीत घरघर तयाखालतें
विमान अजुनी तरळत होतें.

दि. १६-११-१९३७

## माझा देव : : २८

[ राग—पहाडी ]

देउळीं रमेना कधिंही देव माझा ॥ ध्रु० ॥

विसरोनि वार्ता अवघ्या जगाची
होवोनि भूषा सिंहासनाची
नैवेद्य पूजा सेवावयाची
स्वार्थी न असा कधिंकाळीं देव माझा.

रचिवोनि देही झेले फुलांचे
जमवोनि भंवतीं गट अप्सरांचे
करितो रिकामे घट वारुणीचे
आहे न विलासी ऐसा देव माझा.

उठतां कुठेंही रव आर्ततेचे
वारोनिया संकट पीडितांचें
जो ब्रीद राखी खलदंडनाचें
आधार सदा दीनांसी देव माझा.

माजोनि सत्ता भूभार झाला
तो दैत्य गांजी अवघ्या धरेला
स्तंभांतुनी जो अवतीर्ण झाला
दैत्यास सहज निर्दाळी देव माझा.

व्यापोनियां विश्व स्वयंप्रकाशी
प्रकाशवी जो शशि-भास्करांसी
आणी निरोधी ग्रहमंडलासी
चैतन्य जगीं स्फुरवी तो देव माझा
देउळीं रमेना कधिंही देव माझा.

दि. २-१०-१९३९

## यंत्र : : २९

[ जाति–दोहा ]

परिचित कोणी एक मला असे थोर अधिकारी,
कडक म्हणोनी जनतेला ख्यात असे तो भारी.
न्यायकारणीं ठेवी तो निष्ठुर निज मन जागें.
तेविं आपुल्या घरांतही कठोरतेनें वागे.

रोज सकाळीं जाई तो फिरावया नियमानें
आणि टेकडी जवळिल तो चढुनि जाय जोमानें
प्रखर उन्हाळा तापूंदे पडो किती पाऊस,
असो कडाका थंडीचा कधिं न चुके जायास

कधीं जेधवां मजसी तो भेटे मार्गावरती
परीचित असुनी नच बोले दावी परकी वृत्ती
वाटेवरुनी जाई तो ठेवुनि नजर समोर
वृत्ती बघतां ही मजला विस्मय वाटे थोर.

पुढें एकदां ये त्याची कन्या माहेराला
प्रसूत होउनि पहिल्यानें पुत्रलाभ तिज झाला
म्हणुनि जाहली आनंदें दंग घरांतिल सारी
तडक जाय परि बाहेरी फिरावया ही स्वारी.

पडुनि एकदां आजारी वृद्ध तयाची माता
मध्यरात्रिंच्या समयाला सोडुनि गेली जगता
म्हणुनि सकाळीं खिन्नपणें घरचीं सारीं बसलीं
फिरावया ही जाय परी मूर्ती कृश उंचेली.

अटक जाहली एक दिनीं थोर राष्ट्रभक्ताला
क्षुब्ध होउनी जनतेचा जमाव मार्गी जमला
वाट काढुनी त्यांतूनी फिरावया हा गेला
करावयाचें नच कांहीं जणूं जगाशीं याला.

अद्यापीही जातांना कधिं हा फिरावयातें
बघतों जेव्हां मी याच्या निर्विकार वदनातें
विस्मय वाटे मज भारी आणिक गमतें चित्ता
यंत्र मानवी एक जगीं निर्मी खास विधाता.

दि. १५–७–१९४३

## नवा मानव : : ३०

(जाति–माधवकरणी)

भावी कालावरी रोखुनी निर्भय निज दृष्टी
आणखी थोपटूनि दंड
जुलुम जगींचा नष्ट कराया नव मानव आजी
ठाकला उभारुनी बंड.

बंड नव्हे हें, कोंदटलेल्या क्षुब्ध भावनांचा
अटळ हा अवचित उद्रेक
तुफान झंझावात सुटोनी तप्त गोळकांचा
होतसे भूवरि अभिषेक.

दिमाख दावित आजवरी जे सत्तेचे दुर्ग
राहिले उंचावुनि मान
प्रहार करुनी क्रूर तयांवरि नव मानव पाहे
तयांचें करावया चूर्ण.

दुर्बल राष्ट्रं परवशतेच्या क्रूर शृंखलांनीं
बद्ध जीं तळमळतीं जगतीं
लाभावें स्वातंत्र्य तया हें ध्येय अहोरात्र
जागवी नव मानव चित्तीं.

टोंकदार घुसवुनी भूतळीं समतेचा फाळ
तयानें उखडोनी धरणी
उंचवटे मोडुनी पटांगण करुनि तयावरती
चौथरा भव्य उभारोनी.

क्रांतिदेविचें विशाल मंदिर वरतीं उभवावें
जयाच्या भव्य गोपुरांनीं
स्पर्धेनें गगनांत घुसावें नमवित दुनियेला
साध्य हें नव मानव मानी.

विविध जगींचे धर्म मंथुनी संशोधन पुरतें
करुनियां शाश्वत तत्त्वांचें
विश्वबंधुता हाच धर्म नव जगतीं नांदावा,
ध्येय हें नव्या मानवाचें.

स्वातंत्र्याचें निशाण हातीं घेउनि, समतेचा
मुखानें गर्जत जयघोष
ध्येयावरती नजर रोखुनी नव मानव पुढती
चालला तुडवित धरणीस.

विक्रमशाली नव मानव हा संचरता मार्गीं
स्वागता करि सारी सृष्टी
मार्गावरले तरुवर सारे हर्षित होवोनी
तयावरि करिति पुष्पवृष्टी.

दि. १४-९-१९४७

# माझी मैत्रीण : : ३१

[ एक स्मृतिचित्र ]
( जाति–लीलारति )

विस्तीर्ण कोसभर माळ खुला पसरला
उतरतीकडे जो ओढयानें वेढिला
हा माळ संपुनी उतरण सरते जिथें
ओढयाच्या कांठीं ‘ खंडाळी ’ शोभते.

या गांवापासुनि एका हाकेवर
पूर्वेला वसतिस्थान असे सुंदर
भोंवतीं जयाच्या सर्वकाळ पसरली
कडुलिंबाऱ्यांची गारगार सावली.

सुप्रभातकालीं विचारांत गुंगुनी
मी लिंबाखालीं बसलों एका दिनीं
साळुंकी फडकत आली कुठुनीतरी
ती लिंबाऱ्याच्या बसली फांदीवरी.

चिमुकले पिवळसर पाय छान कितितरी
चिमुकलीच पिवळी चोंच तिची गोजिरी
हालवी मान जणु खुणवी कांहीं मला
मैत्रीण गमे मम साळुंकी प्रेमला.

वरि गर्द डहाळ्यांमधें सुबक एकलें
चिमुकलेंच घरटें असे तिनें बांधिलें
ऐकाया अस्फुट चिवचिंव ये त्यांतुनी
वात्सल्यभावना भरुनी जाई मनीं.

मग रोज सकाळीं जाउनि लिंबातळीं
ऐकावी मंजुळ चिंवचिंव घरट्यांतली
बसलेली जवळीं साळुंकी प्रेमला
एकदां बघावी छंद जडे हा मला.

निर्वेध चाललें असें एकदां परी
मी जाय सकाळीं तिथें रोजच्यापरी
विपरीत दृश्य मम नयनापुढतीं दिसें
सर्वत्र विखुरलीं लिंबाखालीं पिसें.

चरकला जीव मी सहज पाहिलें वरी
नोहतें गोड तें घरटें लिंबावरी
विच्छिन्न व्हाळ्या दिसल्या मजला तिथें
जवळीं न दिसे मज साळुंकी परि कुठें.

लिंबावरि कांहींकाळ सुखें नांदलें
बघवे न कुणाला घरटें तें सानुलें
चालला जगीं का दुष्टावा हा असा ?
हा विचार माझ्या व्यथित करी मानसा.

इतुक्यांत पातली साळुंकीही तिथें
दिसतां न तियेचीं बाळें तिजला कुठें
फोडोनी टाहो करि अति आक्रंदन
यातना मना तें दुःख देइ दारुण.

मी तेव्हांपासुनि पुन्हां न गेलों तिथें
परि सहजीं दिसतां साळुंकी मज कुठें
आठवे दृश्य तें आणिक आक्रंदन
भारावुनि जाती अश्रुभरें लोचन.

दि. ६–३–१९४३

# राजा आणि माळी : : ३२

( वृत्त—साकी )

फुललें होतें रम्य चांदणें खुललें अंबर सारें
शोभत होते प्रासादाचे तयांत शुभ्र मनोरे
प्रासादांतिल सुसज्ज ऐशा सुंदर रंगमहालीं
कनकमंचकीं पडला होता राजा वैभवशाली.

जरि केव्हांची उलटुनि गेली मध्यरात्रिची वेळ
साखर झोंपेमधें गुंगुली होती दुनिया अखिल
व्याकुळ चित्तें परी तळमळे राजा जागा अजुनी
जणूं घणाचे घाव मस्तकीं घाली त्याच्या कोणी.

अमित विजेचे दिवे पेटले साऱ्या प्रासादांत
परी दाट अंधार माजला राजाच्या हृदयांत
विषण्णतेनें सोडुनि शय्या आला सौधावरती
सभोंवार उद्यान बहरलें लावी त्यावरि दृष्टी.

उधळित होता अस्मानांतुनि चांद रुपेरी किरणें
हांसत होती सारी सृष्टी न्हाउनि रजतरसानें
उद्यानांतिल सुंदर एका वेलीच्या शेजारीं
उघड्यावरती दगड उशाला घेउनि निजला माळी.

कष्ट करोनी दिनभर शिणली त्याची राकट काया
गाढ झोंपला होता विसरुनि भंवतालीची दुनिया
राबुनि मिळवी भाजीभाकर सेवी सुख निद्रेचें
सहजी वळले कष्टी लोचन तयावरी राजाचे.

किती वेळ तें दृश्य पाहिलें त्यानें सौधावरुनी
नकळत आले भरुनि तयाचे झणिं लोचन अश्रूंनीं
उदास वाटे भंवतालीची तयास दुनिया सारी
दीर्घ उसासे सोडित गेला परतुनि रंगमहालीं.

दि. २-२-१९४१

# बकुळीखालीं : : ३२

( एक स्मृतिचित्र )

( छंद–देवीवर )

देऊळाच्या आवारांत, प्रदक्षिणेच्या वाटेला
होता बकुळीचा वृक्ष, पुष्पफलें बहरला.

एका सुरम्य प्रभातीं, ऊन्ह पडलें कोंवळें
बकुळीच्या वृक्षाखालीं, माझीं वळलीं पाऊलें.

तेव्हां होते दिन माझे, उत्साहाचे आनंदाचे
कृष्णाकांठीं बागडत्या, शाळकरी कुमाराचे.

वृक्षावरील पाहोनी, लाल शेंदरी बकुळें
उल्हासली चित्तवृत्ती, हारखले माझे डोळे.

पडलेला वृक्षाखालीं, शुभ्र सुमनांचा सडा
पाहोनी तीं गोड फुलें, जीव माझा झाला वेडा.

इतुक्यांत तेथें आली, एक परकरी बाला
होती शेजारभगिनी, पूर्ण परिचिता मला.

तिचें स्नेहाळ वदन, आणि पाणीदार डोळे.
रंगविलेली मेंदीनें, होति नाजूक पाऊलें.

पाहे उंचावोनी मान, लाल टपोरी बकुळें
तेथें खिळले त्या क्षणीं, लोभावुनी तिचे डोळे

आस जाणोनी तियेची, चढलों मी वृक्षावरी
सांठविलीं लाल फळें, खिशांमाजीं कितीतरी.
झणी उतरोनी खालीं, गेलों बालेच्या संमुख
पाहतांच आनंदानें उजळलें तिचें मुख

पसरल्या ओंजळींत, अर्पिलीं मीं लाल फळें
हसूं लागलें त्या क्षणीं, आनंदानें तिचे डोळे.

होतों सेवीत यापरी आम्ही निर्भेळ आनंद
आली " ताई ताई " ऐशी कोठूनशी हांक मंद.

जैशी वाऱ्याची झुळूक, बाला पळाली तेथोनी
झटकलों गांवाकडे, मीही बकुळीखालोनी.

काळ गेला कितीतरी, घडोनी ही साधी गोष्ट
आठवतां अजूनही होई मानस संतुष्ट.

शीण आला सोडवोनी, रोज जीवनाची कोडी
लागलीसे उताराला आतां आयुष्याची गाडी.

आज कितीक दिसांनीं, दृष्टीपुढें चित्र आलें
बकुळीच्या वृक्षाखालीं, बालपणीं पाहिलेलें.

गेले विरोनी या क्षणीं औदास्याचे सारे बंध
आणि येई अनुभवा, आज निर्मळ आनंद.

दि. २-१-१९५०

## भानुदास : : ३४

( रिमांड होममधील एक बाल गुन्हेगार )

इतिहासख्यात दुर्ग नव विभवें शोभतसे
भव्य महाद्वारावरि राष्ट्रध्वज फडकतसे.

खोल खंदकासमीप बांधियल्या तटाआंत
बालगुन्हेगारगेह कार्य चालवी निवांत.

पालक लाभे तयास मायाळू कुणि महिला
पदवीहुनि अधिक तिचें भूषवि सौजन्य तिला.

गेह पहाया मज ये पाचारण एकवार
पाहुनि तें मजलागीं तोष जाहला अपार.

मोकळ्या पटांगणांत वृक्षाच्या सावलींत
गेहांतिल बालांची शाळा भरली मजेंत

गडद निळ्या खादीच्या गणवेषें नटलेलीं
भूमिवरि वीसतीस असति मुलें बसलेलीं.

पालक महिला खुणवी त्यांतिल एका मुलास
पाचारुनि त्यास म्हणे " ये इकडे भानुदास. "

कृशदेही कृष्णवर्ण बाल एक ये पुढतीं
खळबळलें मम अंतर करुणमूर्ति बघुनी ती

पालक महिला सांगे करूनी चोरी लहान
आप्तहीन पोर तिथें आलें होतें अजाण.

जवळ घेउनी तयास मी पाठीवरुनि हात
फिरवितांच आणि अश्रू जमले मम लोचनांत.

खांद्यावरि कर ठेवुनि वदलों सस्नेह त्यास
"राष्ट्राचा थोर पुत्र होइ बाळ भानुदास.

लांछित तव गतजीवन असुंदे वा जातकुळी
तातमाय कोण तुझे आम्ही पाहूं न मुळीं.

या जगतीं जन्मानें कुणि नाहीं सान थोर
होतां तूं कीर्तिमंत जग नमेल तुजसमोर."

आशीर्वच हें माझें बाला त्या नच कळलें
परि मम गालावरुनी दोन अश्रु ओघळले.

दि. ३-२-१९५३

## वेडीं मुलें : : ३५

(जाति—समुदितमदना)

भारतमाते ! पुत्र शहाणे अमित तुला लाभले
तुझ्या कुशीला परी जन्मलीं कांहीं वेडीं मुलें ॥ ध्रु० ॥

परदास्याची बेडी होती पायीं तव जेधवां
पुत्र शहाणे तुझे दंगले संसारीं तेधवां.

कांहीं वेडीं मुलें तयांचीं भडकुनि गेलीं मनें
क्रांतीपूजा केली त्यांनीं रुधिराच्या तर्पणें.

मदांध सत्ता निर्दयतेनें टाकी त्या चिरडुनी
हांसत चढले फांसावरि ते गीता करिं घेउनी.

मायभूमिला मुकले कांहीं परदेशा जाउनी
स्वीकारियला अंदमानचा हासत "कोलू" कुणी.

वेडे म्हणुनी जरी जगानें तेव्हां त्या दूषिलें
अमर कीर्तिनें जगीं गाजलीं तव हीं वेडीं मुलें.

* * *

आणिक कांहीं वेडे पुढतीं सजले झगडायला
शस्त्रावांचुनि अभिनव संगर त्यांनीं आरंभिला.

साहुनि लाठीमार कायदे भंगुनियां प्रत्यहीं
सत्तेसंगें झुंज खेळले निर्भय सत्याग्रही.

बलाढ्य सत्ता नमली तव या वेड्या पुत्रापुढें
डौलानें मग नभीं आमुचा राष्ट्रध्वज फडफडे.

भारतमाते ! तुजभंवतींचीं तुटलीं मग बंधनें
स्वातंत्र्याचा सूर्य तळपतो तुजवरि नव दीप्तिनें.

कांहीं वेडीं मुलें अजुनिही सर्वस्वा वेचुनी
कायावाचामनें तुझ्यास्तव खपती रात्रंदिनीं.

वेडे म्हणुनी कितिक शहाणे जरी तया दूषिती
या वेड्यांनीं वेड लाविलें साऱ्या जगताप्रती.

दि. ११–५–१९५१

## ती रात्र : : ३६

[ ता. ३०।१२।१९५२ च्या चांदण्यारात्रीं वेंगुर्ले येथील समुद्र-किनाऱ्यावरील डाकबंगल्यांत माझा मुक्काम होता त्या रात्रीच्या स्मृतीवर प्रस्तुत कविता आधारली आहे. ]

मला ती रोज आठवे रात ॥ ध्रु० ॥
सागरतीरीं खडकावरती
सुत सहचर घेउनि सांगातीं
बसलों एका सुंदर रातीं
आल्हादक चांदणें बहरलें होतें दाहि दिशांत.

करीत होता सागर गायन
साथ तयाची सुरेल घेउन
करिती लाटा सुरम्य नर्तन
वर्षत होती वरुनि तयावरि चंदेरी बरसात.

दृष्टी जेव्हां मागें वळली
सरळ दूरवर विस्तरलेली
सुंदर नगरी नयना दिसली
वेंगुर्लें अभिधान जियेचें आहे जनविख्यात.

भंवतालीं माडांच्या राई
करिति पहारा ठायींठायीं
विंझणवारा घालिति कांहीं
कोंकणराणी दिसे झोंपली दमुनी येथ निवांत.

माडांच्या घन राईमाजीं
फिरली मानसदृष्टी माझी
जीर्ण खोपटें मज दिसलीं जीं
निर्धनता अज्ञान भरोनी राहे त्या घरट्यांत.

उदार भारी निसर्ग सुंदर
परी मानवें जगीं खरोखर
निर्मियलें आपसांत अंतर
कुबेर थोडे अमित दरिद्री भरले या जगतांत.

मनांत येतां विचार असले
निसर्ग सुंदर बघुनि लाभलें
सुख पळभर तें लयास गेलें
उदास लोचन सागरतीरीं वळले एक क्षणांत.

समोर पसरे अनंत सागर
डोईवरती अनंत अंबर
विरलें मम औदास्य भराभर
लहरीसंगें रंगुनि गेलों निर्मळ आनंदांत
मला ती रोज आठवे रात.

दि. ३०-१-१९५३

## कृष्णवर्तुळें : : ३७

जीव कळवळे बघुनी तुझिया नयनाखालीं कृष्णवर्तुळें ॥ ध्रु० ॥

पहाटवेळीं निद्रेंतूनी
उठतां येते पाकघरांतुनि
बशाकपांची किणकिण कानीं
माझ्या आधीं उठुनी खपसी रोज यापरी तदा मज कळे.

लगबग करुनी मग सुटतां नळ
तापवुनीयां प्रभूत निर्मळ
स्नानासाठीं देसि उष्ण जल
ओतुनि घेतां अंगावरि तें तनूसवें मम अंतर पोळे.

पाकघरीं एकटी राबसी
भाजीभाकर रुचकर ऐसी
माझ्या ताटीं ऊन वाढिसी
अन्न जरी हें मिळे आयतें घास तयाचा गिळतां न गिळे.

पाकघरांतिल करुनी आवर
दमुनी डुलकी घेसी पळभर
वेळ चहाची होते तोंवर
उठुनि तयारी करिसी फिरुनी, तुज विश्रांती मुळिंही न मिळे.

पुढें जेवणें मग रात्रीचीं
आवरतां हीं कामें घरचीं
सहज दहाची वेळ यायची
विषाद वाटे मज भारी तव पेंगुळलेले बघुनी डोळे.

माझ्यासाठीं कष्ट एवढे
जीव लावुनी करिसी वेडे !
सदा राबतां बघुनि तुजकडे
काय तुझ्यास्तव केलें मी हें मनांत येतां जीव कळवळे
जीव कळवळे बघुनी तुझिया नयनाखालीं कृष्णवर्तुळें.

दि. ५-९-१९५२

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## नंदीवाला : : ३८

( जाति–पादाकुलक )

हरीपूरच्या मार्गावरती
चिंचबनांतिल निसर्गसुंदर.

रामपारच्या उन्हांत शोभे
एक पुरातन गणेशमंदिर.

आवाराबाहेर तयाच्या
जुनाट छप्पर असे एकलें.

आज उतरले तयांत दिसती
कुणी फिरस्ते नंदीवाले.

पसरुनि बसलीं बायापोरें
दोन तीन त्यांमधें बापई.

बाळा नंदी एक शिंगरू
मिळुनि तयांचें कुटुंब होई

गल्ल मिशांचा प्रमुख तयांचा
लोखंडासम होता कणखर.

सकुतूहल मी जवळ जाउनी
बोलुं लागलों तयाबरोबर.

" गांव कोठलें ? " म्हणुनी पुसतां
निजभाषेनें वदला उत्तर.

" जिथें जेधवां राहूं आम्ही
तेंच आमुचें गांव खरोखर."

" जात कोठली ?" म्हणुनी पुसतां
" नसे ठाउकी " आलें उत्तर.

आखुड दाढीवरुनि तयाच्या
मुसलमान त्या म्हणा हवेंतर.

परि नंदीच्या शुभ्र कपाळीं
दिसति देवताप्रतिमा नाना.

तयावरुनि वा रिवाज़ बघुनी
अथवा हिंदू तयास माना.

हवें निधर्मी राज्य भारतीं
रोज गर्जना उठती व्योमीं.

क्षणभर माझ्या मनांत आलें
नंदीवाला खरा निधर्मी.

बोलुनियां एवढें झणी तो
नंदी सजवावया लागला.

कुतूहलें मी पाहुं लागलों
तिथें मांडिल्या संसाराला.

चूल पेटती जवळ तियेच्या
लोंबत होता एक पाळणा

उघड्यावरि तो बघुनि पसारा
मनांत उठले तरंग नाना.

एक गांव ना गेह तयांचें
नसे अडोसा नसे संपदा.

कशास कुलुपें कड्या हव्या मग ?
कशास पोलिस आणि कायदा ?

आज इथें हे नंदीवाले
भटकत भटकत आले अवचित.

बंध कशाचे नसती यांना
उद्यांच हे जातील कदाचित्.

पुन्हां आजच्यासमान हिंडत
येतिल जेव्हां पुनश्च येथें

कुणि सांगावें कीं त्या समयीं
असेन किंवा नसेन मी तें ?

दि १०-१०-१९५०

## प्रदक्षिणा : : ३९

[ एका खेडेगांवांतील देवालयाच्या आवारांत पाहिलेल्या दृश्यावर प्रस्तुत कविता आधारली आहे. ]

( जाति–लीलारति )

घालिते रोज ही प्रदक्षिणा माउली
कोणत्या संकटें असेल मारावली ?

देवळासमोरिल दगडी पारावरी
सळसळतो पिंपळ जुनाट हा कितितरी.
परमेश तयाला मानुनियां अंतरीं
भक्तिनें तयाच्या सेवेला लागली.

नुकतेंच पदार्पण जरि केलें यौवनीं
प्रौढता अकालीं आली हिजलागुनी.
टाकिते पाउलें अधोवदन होउनी
उमलली तंवर कां कलिका कोमेजली ?

अज्ञानी अथवा क्रूर नराधम कुणी
जाहला हिच्या कां सौभाग्याचा धनी.
छळतसे हिला तो उगाच रात्रंदिनीं
म्हणुनि कां दीन ही झुरणीला लागली ?

लाभुनियां अथवा हिजला प्रेमळ पती
कुणि समाजकंटक या उभया गांजिती.
खल भाउबंद वा छळिती निष्ठुरमती
जगतासि म्हणुनि कां अबला वैतागली ?

कां दारिद्र्याचा वणवा भंवतीं जळे
म्हणुनियां अभागी अबला ही तळमळे !
कां संतानाचें सौख्य नसे यामुळें
अवकळा जीवनावरी हिच्या पसरली ?

हिज खिन्न बघोनी होति मना यातना
परि प्रदक्षिणांनीं टळल्या विपदा कुणा ?
हटतील संकटें कशी झगडल्याविना
बोंचते मनाला शंका ही एकली.

*          *          *

घालिते रोज ही प्रदक्षिणा माउली
कोणत्या संकटें असेल भारावली ?

दि. ७-७-१९४१

## तीन खून : : ४०

[ अन्नधान्यटंचाईच्या दारुण काळांतील एक भीषण समाजदृश्य ]

( राग–भैरव )

अवसेची मध्यरात्र जाय ओसरून
चोहिंकडे गाढ तिमिर पसरला भयाण
जीर्ण झोपडींत बसे रडत माय कोणी
घेउनि बाळें जवळीं दोन दीनवाणी.

तीन दिवस मुळिं न तया खावया मिळालें
अन्नाविण तडफड तीं करिति दीन बाळें
चिमुटहि उरलें नव्हतें धान्य तिच्या गेहीं
अशरण होउनि अबला रडे धाइधाई.

देउनि दामहि न मिळे धान्य मुळीं कोठें
निर्धन अबलेला मग कसें मिळावें तें ?
दिवसभरी वणवण ती हिंडली उन्हांत
धान्याचा कणहि तिला मुळिं न होइ प्राप्त.

समजावी बाळांना परोपरीनें ती
ऐकती न बघुनी हे त्रस्त माय चित्तीं
वैतागुनि ती वदली " कसें करूं देवा ! "
देवाविण तिज नव्हता अन्य जगिं विसावा.

तळमळ निज बाळांची तिजसि पाहवेना.
उसळे जो क्षोभ मनीं तिजसि साहवेना.
करि निश्चय मनिं कांहीं शीघ्र मग उठे ती
ओढोनी धरि दोन्ही बालकांस हातीं.

घेवोनी त्यांस निघे तडक जावयातें
अंधारांतुनि तुडवित कितिक रुक्ष शेतें
थोरली विहीर असे एकल्या मळ्यांत
जवळिं तिच्या येवोनी पातली क्षणांत.

धरुनि मुलें दोन करीं हळुंच आंत जाई
जल बघतां निमिष तिचें कंपित मन होई.
निर्दय मन करुनि परी ती कठोर हातें
खोल जलीं लोटुनि दे उभय बालकांतें.

झणिं मागोमाग उडी स्वयें जलीं घेई
खळबळलें जल क्षणभर सकल शांत होई
कांपति कांठावरले बघुनि वृक्ष सारे
तारागण हें बघुनी अंबरीं थरारे.

उलटुनि ती काळरात्र दिवस दुजा आला
नच दिसली माय मुलें दाद नच जगाला
बडबडती शेजारी "उठुनि जाय बाई"
मन माने तेविं वदे कुणी कांहिंबाही.

दोन दिसांनीं पसरे वृत्त चहुंकडे तें
विहिरीच्या पाण्यावरि तरंगती प्रेतें
बघायास मग सगळा गांव जमा झाला
गरिबास्तव नच येती आसवें कुणाला.

वदती जन जमलेले तिथें आपसांत
अपमृत्यू म्हणाति कुणी, कुणी आत्मघात
परि विचार करितां मज पटतसे मनास
अपमृत्यू नसती हे तीन खून खास.

दि. १५-२-१९४३

## महर्षि : : ४१

( जाति–पादाकुलक )

प्रशांत ऐशा एक सकाळीं
बसलों होतों मुदित मनानें

हळुंच येउनी सेवक सांगे
दारीं आले कुणी पाहुणे.

कुतूहलानें करुनी लगबग
तडक उठोनी गेलों अंगणिं

चकित जाहलों अतीव अवचित
वंद्य महर्षी समोर बघुनी.

गरम लांबडा कोट तनूवर
निळसर मफलर गळ्यासभोंतीं

आखुड दाढी शुभ्र वाढवी
कृश वदनाची पवित्र कांती.

कुशल पुसोनी झणीं तया मी
पद स्पर्शुनी केलें वंदन

कृश कर अंगावरुनी फिरतां
सजल जाहले मदीय लोचन.

स्थापुनि समतासंघ भारतीं
सतत तयाचा प्रचार करुनी

अंगिकारिलें कार्य नवें तें
समजावुनि मज दिलें तयांनीं.

सादर मग मी हळूच वदलों
“ विश्रांतीचें वय हें अपुलें ”

ऐकुनि वच ते हंसुनि महर्षी
संथपणानें मजला वदले.

“ कुडींत आहे प्राण तोंवरी
मानवतेची करीत सेवा

सतत कार्यरत रहावयाचें
हाच आवडे मला विसावा.

हवी वाटली जरि विश्रांती
मरणोत्तर ती मिळे चिरंतन

म्हणुनि सारखें कार्य करावें
जगीं जोंवरी लाभे जीवन. ”

ऐकुनि वच तें मजला वाटे
जनसेवेचें तप आचरुनी

आत्मिक बळ जें मिळे तयावर
थोर महात्मे जगती भुवनीं

*        *        *

तेव्हांपासुनि भारतांतले
जई महात्मे स्मरणीं येती

दर्शन देउनि मज गेले ते
वंद्य “महर्षी अण्णा” स्मरती.

दि. ३०-१-१९४७

# विहगास : : ४२

( राग–दुर्गा )

नभ तुडवित जा, ढग कापित जा,
बंध धरेचे सकल झुगारुनि रविमंडल तूं भेदुनि जा ॥ ध्रु० ॥

माळावरि तूं नकोस खेळूं
उद्यानीं वा नको घुटमळूं
तृणांकुरांना कळ्याफुलांना वनवेलींना विसरुनि जा.

नाजुक असले परोपरीचे
बंध सकल पार्थिव जगताचे
प्रगतीला तव रोधक तें तें निष्ठुरतेनें ढकलुनि जा.

मातापितरें सगेसोयरे
परंपरेचे पाइक सारे
'मळलेला पथ नकोस सोडूं' तुज ऐशा वदतील गुजा.

धाडस कांहीं केल्यावांचुन
खडतर मार्गे संचरल्याविण
झुंजक आयुष्याची कैशी अनुभवितां येईल मजा.

चीत्कार किती श्रवणीं येतिल
घुबडेंही घूत्कार घुमवितिल
करुण अशुभ लोपेल असे मधु सूर हवेवरि उधळित जा.

अभ्राच्छादित दिवस असूंदे
काळोखी वा रात्र असूंदे
तेजाचा तूं स्फुलिंग बनुनी अंधाराला उजळित जा.

अवखळ वाऱ्यासंगें झगडत
जाशिल अंबरपटला छेदित
मुदित मनानें पाहिन तुझिया उड्डाणाची इथुनि मजा.

दि. ६-२-१९५३

## तूं शांत झोंप घेई : : ४३

(गझल)

संपेल रात्र आतां, तूं शांत झोंप घेई ॥ ध्रु० ॥

संसार भोंवतींचे निद्रेंत दंग झाले
गगनांत चांद तारे बघ पेंगळून गेले
दुनियेंत जागृतीचा रव येइना कुठेंही
सुचवी निसर्ग तूंतें, तूं शांत झोंप घेई.

संसार वाढलेला आला कठीण काळ
ही काळजी वहासी हृदयांत सर्वकाळ
तुज झोंप येइना कां मज ज्ञात सर्व कांहीं
चिंता मुळीं नको ती, तूं शांत झोंप घेई.

जरि दुष्ट काळ आला, सकलांस तो समान
हटतील आपदा कां कधिं काळजी करून ?
झगडेन एकला मी, मज भीति ना मुळींही
सांभाळुनी गृहातें तूं शांत झोंप घेई.

गृहकष्ट ओढुनीयां जातेस तूं दमोनी
दिवसांतिं शांत निद्रा, तुजला हवी म्हणोनी
मी रोज चिंतनानें जागा उशीर राही
लखलाभ तें मला गे ! तूं शांत झोंप घेई.

जरि युक्त कंटकांनीं संसार रम्य बाग
नसती निळ्या नभीं कां कवि कृष्ण मेघ सांग
दुःखामुळें जगीं या सौख्यास मोल येई
हें बागवोनि चित्तीं तूं शांत झोंप घेई.

संसार मार्गगामी तूं मी सहप्रवासी
सोसोनि ऊन्हवारा तुडवीत कंटकांसी
केला प्रवास सारा उरला करूं कसाही
चिंता त्यजूनि सारी तूं शांत झोंप घेई.

दि. १२-९-१९५३

## स्फूर्ति : : ४८

( जाति–पादाकुलक )

विश्वांमाजी दिव्य तेज जें
राहे द्यावापृथिवी व्यापुनि
वदति कुणी चैतन्य तयाला
स्फूर्ती परि मी तयास मानी.

सूर्योदय होतांच धरेवर
किरण तयाचे करिती नर्तन
अखिल जगाला तेव्हां घडतें
नभःस्फूर्तिचें मनोज्ञ दर्शन.

रजनी येतां चमकति तारे
कधीं बहरतें रम्य चांदणें:
अनंत अंबरपटलावरलीं
स्फूर्तीचीं तीं दिव्य दर्शनें.

उद्यानांतिल विविध लतांवर
कळ्या उमलुनी सुमनें होतीं
वनस्पतींच्या जगतांतिल ती
सांजसकाळीं हंसते स्फूर्ती.

श्रवणी येतां भान हरपवी
गोड गळ्यांतिल सुरेल गायन
संगमरवरी स्वरभूमीवर
स्फूर्तीचें तें सताल नर्तन.

दूरदूर जो प्रियकर त्याचें
स्मरण प्रियेच्या मना नाचवी
अंतःस्फूर्ती परस्परांतिल
चमत्कार हे नाजुक घडवी.

विश्वांतिल या भव्य दिव्य जें-
सौंदर्याचें घडवी दर्शन
खचित विखुरले असती तेथें
चमचमणारे स्फूर्तीचे कण.

या स्फूर्तीची वीज लखलखे
कविहृदयाच्या आकाशावर
तदाच निघती कवि वदनांतुनि
सत्काव्याचे चरण भराभर.

विश्व उजळत्या या स्फूर्तीचें
तेज अंतरीं प्रकाशल्याविण
उगिच कशाला करावयाची
निर्जिव शब्दांची ती गुंफण ?

दि. १८-२-१९५२

## पंडित जवाहरलाल : : ४५

( चाल–इथेंचि थारा पराक्रमाला )

नाम जयाचें पडतां श्रवणीं चित्र जयाचें बघुनि लोचनीं
थोर आदरें मस्तक नमतें स्फूर्ती उसळे कणांकणांतुनि.
हिंदभूमिच्या भांडारांतिल कोहिनूर जो असे खरोखर
भारतनेता म्हणुनी गाजे आज जगीं नेहरू जवाहर.

खिन्न भारता व्यापुनि होती परवशतेची प्रदीर्घ रजनी
मार्ग दाविती तयास तारे उज्ज्वल तेजें नभीं चमकुनी.
परसत्तेच्या सवें झगडले स्वातंत्र्यास्तव किती वीरवर
मुक्त मायभू केली ज्यांनीं प्रमुख तयांतिल असे जवाहर.

लाथाडुनि वैभवा जयानें हांसत कारावास सेविला
मायभूमिचें दास्यविमोचन ध्येय एकलें हेंच जयाला.
उदक तियेच्या स्वातंत्र्याचें घेउनि अंतीं निज हातावर
परसत्ता घालवी येथुनी झगडोनी झुंजार जवाहर.

परवशतेची निशा संपतां लयास गेलें अखिल अमंगल
भारतभूमीवरी उजळली स्वातंत्र्याची प्रभात मंगल.
उज्ज्वल रविच्या किरणीं झळके हिंददेविचें सुवर्णमंदिर
मंगलपूजा तया मंदिरीं सद्भावें करितसे जवाहर.

" सत्य अहिंसा " मंत्राचा जो निर्माता जगवंद्य महात्मा
जमुनातीरीं देह सोडुनी स्वर्गीं सेवी चिर विश्रामा.
मातृभूमिच्या उत्थानाचें कार्य तयाचें घेइ शिरावर
कायावाचामनें तयास्तव झटताहे पंडीत जवाहर.

हिमालयाच्या शुभ्र यशासम नाम नेहरू जगतीं गाजे
आणि तयाच्या धवल यशाला नगराजाची उपमा साजे.
हिंदभूमिचीं दोन भूषणें नामवंत जीं सांप्रत भूवर
एक तयांतिल असे हिमालय आणि दुजे नेहरू जवाहर.

आज जगींच्या राष्ट्रांमाजी समानतेचें स्थान भारता
बहु प्रयासें मिळवुनि देई प्यार आपुला भारतनेता
नेतेपण घेणार जगाचें अविलंबें हिंदभू खरोखर
संपादाया भाग्य थोर हें दीर्घायू होउंदे जवाहर.

दि. २५-६-१९४९

# एक मागणें : : ४६

(राग–भैरवी)

जिथें ऐश्वर्यवंतांचा शकेना जावया तोरा
जगाच्या द्वेषबुद्धीला जिथें नाहीं मुळीं थारा
निसर्गाचा खुला आहे जिथें सेवावया मेवा
तया ठायीं मला देई सदाचा वास तूं देवा !

मिळाला कोर पोटाला तयानें तुष्ट जे होती
भिजोनी चिंब घामानें धन्याला जे दुवा देती
इमानी माणसें ऐशीं जिथें वसतात आनंदें
तयाठायीं मला देवा ! सदाचा वास लाभूंदे.

असोनी दक्ष संसारीं गुणांनीं जेथल्या ललना
सदा जपतात रक्षाया कुलाच्या योग्य अभिमाना
अशा या नांदती म्हणुनी असे पावित्र्य ज्या भूला
तया भूमीवरी वसती सदाची लाभुंदे मजला.

नसांतूनी जरी वाहे स्वदेशप्रेम हें रुधिर,
कृतीनें दाविती वदनीं फुकाचे शब्द नसणार,
प्रसंगीं पेट घेणारे असे वसती जिथें तरुण
वसाया देइ तूं देवा ! मला ऐसें सदा स्थान.

सदा केली निसर्गानें जयांची वाढ जोमाची
फुलांवाणी मुलें जेथें खुल्या उल्हासवृत्तीचीं
अशीं तेजाळ नक्षत्रें प्रकाशा देति ज्या ठायीं
तया स्थानीं मला देवा ! सदाचा वास तूं देई.

खुलें आकाश ज्या ठायीं, खुला वाहे जिथें वारा
सभोंतालीं खुली सृष्टी खुला खगवृंद गाणारा
खुल्या सृष्टीमधें ऐशा खुले वसती जिथें जीव
अशा ठायीं मला देई, तुझ्या पायीं सदा ठाव.

जुलई १९२२

# परिशिष्ट—टीपा

लेखक :—**क. श्री. काळे,** M. A. B. T., Dip. Ed.

[ खालील टीपा कवितांच्या अनुक्रमाप्रमाणें आहेत.]

## १. प्रभुचरणीं

विश्वाचें मांगल्य, ज्ञानाच्या प्रसारांत, श्रमिकांना योग्य सुखस्वास्थ्य लाभण्यांत, मानवाच्या मूलभूत स्वातंत्र्यांत सामावलेलें आहे ही या मंगलाचरणांतील कल्पना कवीच्या जीवनविषयक दृष्टिकोनाची निदर्शक आहे. तर्कनिष्ठ बुद्धिवादावर आधारलेली मानवताभिमुख समाजसुधारणा हें केशवसुतांचें काव्यध्येय काव्यविहारींच्या काव्यांतहि आढळून येतें, या दृष्टीनें ही कविता लक्षणीय आहे.

## २. माझी कविता

काव्यविहारींची काव्यविषयक भूमिका या कवितेंत व्यक्त झाली आहे. केशवसुताप्रमाणेंच काव्यविहारींनींहि काव्यविषयक आणखी एकदोन कविता लिहिल्या आहेत. काव्यनिर्मितीसंबंधाची त्यांची या कवितेंतील कल्पना Sponteneous overflow of powerful feelings — या आंग्लकवि वर्ड्स्वर्थच्या सुप्रसिद्ध उक्तीशीं ताडून पाहणें उद्बोधक ठरेल. निसर्गातील रम्य दृश्यें, शेतकरी-कामकऱ्यांचें प्रामाणिक कष्टाळू, पण आनंदी जीवन, निरागस दुबळ्या प्राण्यावर होणारा अन्याय, संपत्तीची विषम वांटणी व तज्जन्य सामाजिक अन्याय, दुःखें व कटुता, राजकीय हुकूमशाहीबद्दलची चीड इत्यादि त्यांच्या काव्याचे या कवितेंत वर्णिलेले विषय त्यांच्या केशवसुत सांप्रदायिकत्वाचे द्योतकच आहेत. याच संग्रहांत पुढें असलेल्या 'स्फूर्ति' या कवितेंतील त्यांची काव्याविषयक भूमिका या संदर्भात जरूर ताडून पाहावी.

## ३. सांत्वन

वर्ड्स्वर्थच्या Solitary Reaper या कवितेंतील मध्यवर्ती कल्पनेशीं या कवितेंतील मध्यवर्ती कल्पना ताडून पाहण्यासारखी आहे. गायनादि कला वा सौन्दर्य यांचा मानवी मनावर होणारा परिणाम चिरकाल निरामय आनंद देणारा असतो ही या कवितेंतील मध्यवर्ती कल्पना Music when soft voices die vibrates in the Memory या ओळींतील शेलीच्या कल्पनेवरून सुचली असावी. The music in my heart I bore, long after it was heard no more किंवा They flash upon the inward eye, which is the bliss of solitude या अनुक्रमें Solitary Reaper आणि Daffodils मधील वर्ड्स्वर्थच्या ओळींत वरील अभिप्राय व्यक्त झाला आहे. सुरुवातीच्या काळांत Shelly, Byron, Wordsworth, वगैरे आंग्ल कवींची कविमनावर असलेली छाप यासारख्या कवितावरून दिसून येते.

## ४. हृदयाचें गान

काव्यविहारी यांचे अलीकडील संग्रह वाचले तर या कवीनें कधींकाळीं प्रेमकाव्यें लिहिलीं असतील हें खरें सुद्धां वाटणार नाहीं. पण कवीच्या जीवनांत एक काळ असा होता कीं ज्या वेळीं प्रणयाशिवाय अन्य कोणतीच भावना आपल्या काव्याचा विषय होऊं शकणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. हें काव्यविहारमधील ‘ प्रेम आणि काव्य ’ या कवितेंतील,

> प्रणयावांचुनि दुजा न रमणी । गमे विषय मज काव्याला
> प्रणय गान मम प्रणयचि जीवन । प्रणय जगीं अवघा भरला.

या ओळीवरून दिसून येईल. ‘ हृदयाचें गान ’ ही कविता अभ्यासू दृष्टीनें काव्यविहारींच्या कवितांतील स्थित्यंतरें पाहण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. केशवसुतांच्या काव्याच्या अभ्यासानें असो वा मूळ प्रकृतीच बुद्धिवादी क्रांतिकारक विचारांची असो, एकदां त्यांनीं समाजसुधारणा, सामाजिक अन्यायाची चीड वगैरे विषयांवर तडफदार कविता लिहावयाला सुरुवात केल्यानंतर मात्र त्यांनीं एकहि प्रेमकाव्य लिहिलें नाहीं हें खरें. १९१६–१७ च्या सुमारास मात्र त्यांनीं भरपूर प्रेमकविता लिहिल्या, त्यापैकींच ही एक

आहे. त्यांच्या पूर्वीच्या प्रेमकवितांतील भावनेची उत्कटता पाहिली तर त्या स्वानुभूतीवर आधारल्या असल्या पाहिजेत असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

## ५. चिमुकला संसार

१९१८ सालीं एलएल्. बीच्या अभ्यासासाठीं मुंबईस गिरगांवांतील मोहन बिल्डिंगमधील चाळींत राहत असतांना तेथील लहान मुलांचा खेळ पाहून काव्यविहारींना ही कविता सुचली. शिशूंच्या निरागस व्यापारांचें जिव्हाळ्यानें व समरसतेनें केलेलें हें वर्णन म्हणजे उत्कृष्ट शिशुगीताचा नमुनाच होय.'' शिशूंच्या बोबड्या बोलांत त्यांच्या समजल्या जाणाऱ्या भावनांचें वा विचारांचें चित्रण म्हणजेच 'शिशुगीत'. ही शिशुगीताची व्याख्या मात्र मला या ठिकाणीं अर्थातच अभिप्रेत नाहीं. चाळींतील मुलांच्या सहजक्रीडेसारख्या साध्या विषयांत रंगून कवीनें त्याचें सरस वर्णन या ठिकाणीं मोठ्या काव्यमयतेनें केलें आहे. या साध्या विषयांतून शेवटीं काढण्यांत आलेला मोठा तात्त्विक आशय कवीचा केशवसुतसंप्रदाय दर्शवितो. ओघयुक्त प्रसन्न कथनशैली व उठावदार जिवंत प्रसंग-चित्रण ही काव्यविहारींच्या काव्याचीं वैशिष्ट्यें या कवितेंत प्रकर्षानें प्रत्ययास येतात.

[ पोबारा—पलायन ]

## ६. सौंदर्य म्हणजे

सौंदर्यासंबंधींची कवीची या कवितेंत व्यक्त झालेली कल्पना मोठी उदात्त आहे. सौंदर्य हें सत्य व शिवही असलें पाहिजे. त्यांत मोहकतेबरोबर सात्त्विकता व पावित्र्य असलें पाहिजे. मेल्याला जिवंत करण्याइतकी प्रभावी प्रेरक शक्ति सौंदर्यांत असली पाहिजे. या कवीच्या कल्पना अस्सल भारतीय आहेत, भारतीय संस्कृतिविशिष्ट आहेत. आपले सुंदर डोळे एका स्त्रीच्या मनांत विषयवासना जागृत करण्यास कारणीभूत झाले हें समजतांच त्यांचें सौंदर्य कवडीमोल मानून क्षणार्धांत ते फोडून टाकणाऱ्या सूरदासाच्या मनांत सौंदर्याचा याहून दुसरा कोणता अर्थ अभिप्रेत असेल? अभयकुमाराला दिलेल्या मुलाखतींत महात्माजींनीं सांगितलेली सौंदर्याची आपली कल्पना व सुप्रसिद्ध उर्दू कवि सागर नाझामीनें पुढील वाक्यांत व्यक्त केलेली सौंदर्यासंबंधींची कल्पना वरील कल्पनांशीं एकरूपच आहेत, हें मुद्दाम पाहण्यासारखें आहे.

सागर म्हणतो, " लचकते हुअे कमरोंके बजायं झुकते हुअे कमरोंके देखकर जिस आँखसे आसू टपकते है वह आख सबसे बडी कवी है। "

## ७. मंजुळा

अगदीं सहज सुंदर रीतीनें काढलेलें एका साध्याभोळ्या निरागस खेडवळ मुलीचें प्रसन्नरम्य शब्दचित्र म्हणजे काव्यविहारींच्या उच्च रसिकतेचा व प्रभावी वर्णनशैलीचा एक सुंदर नमुना आहे. ज्या खेड्याच्या वातावरणांत त्यांचा जन्म झाला, बालपण गेलें, नव्हे जवळजवळ उभी हयात गेली, त्या खेड्यांतील जीवनासंबंधींची त्यांची ओढ, त्या खेडुतांच्या संबंधींचा त्यांचा जिव्हाळा व प्रेम त्यांच्या अनेक कवितांत व्यक्त झालें आहे. अशाच जानपद गीतांपैकीं हें एक उत्तम गीत आहे. एका अर्थानें काव्यविहारींच्या स्वतःच्या कवितेचेंच हें रूपकात्मक वर्णन वाटावें इतकें मंजुळेचें या त्यांच्या कवितेंत केलेलें वर्णन लक्षणेनें त्यांच्या काव्यासच लागूं पडतें, हा एक गमतीदार योगायोग आहे यांत शंका नाहीं. " तिज माहित नव्हते शहरांतिल चोजले। लाजणें मुरडणें असेल मग कोठलें ? " असें मंजुळेप्रमाणेंच काव्यविहारींच्या कवितेसंबंधींहि म्हणतां येणार नाहीं काय ?

## ८. जाईच्या फुलास

साभिप्राय रेखीव रूपकें हें काव्यविहारींच्या काव्याचें एक उल्लेखनीय वैभव आहे. आर्थिक व सामाजिक विषमता व तज्जन्य अन्याय, कटुता, मानवांतील समाजहितविघातक दोष इत्यादींवरील त्यांची उपहासात्मक व उपरोधात्मक टीका, दलितांच्या व पतितांच्या विषयीं त्यांना वाटणारी सहानुभूति त्यांच्या अनेक कवितांत प्रभावीपणें व्यक्त झाली आहे. जाईच्या फुलास हें एक हीनकुलजात तरुणीच्या जीवनावरील रूपक त्यांच्या व्यापक मानवतावादाचें द्योतक आहे. गृहिणीचें पवित्र जीवन जगण्याची ओढ असलेल्या एका सात्त्विक प्रवृत्तीच्या हीनकुलजात तरुणीची समाजाच्या उपेक्षेमुळें कशी कुचंबणा होते, हीनत्वाचा व अनीतिमत्त्वाचा पारंपारिक शिक्का व सामाजिक बहिष्कार तिच्या उन्नतीच्या आड कसा येतो, व त्यामुळें तिची किती केविलवाणी अवस्था होते याचें हें रूपकात्मक चित्रण खरोखर हृदयस्पर्शी आहे. स्वतंत्र मानवतावादी वृत्तीच्या कवीच्या तरुण मनाला

त्या वेळीं वाटलेली चीड व तिच्या उद्धारासाठीं वाटेल तें साहाय्य करण्याची कवीची तयारी कवितेच्या उत्तरार्धात मोठ्या आवेशपूर्ण भाषेत व्यक्त झाली आहे. तत्कालीन भावनाप्रधान समाजसुधारक तरुणाच्या मनोवृत्तीचें हें एक प्रातिनिधिक चित्रण आहे.

## ९. खार आणि घार

" मा निषाद प्रतिष्ठां त्वं अगमः शाश्वतीः समाः " या आदिकवीच्या पहिल्या काव्यपंक्तींतील सात्त्विक संतापाच्या भावनोद्रेकाचें स्मरण करून देणारी ही कविता माणुसकीच्या सुवासानें दरवळून निघाली आहे. कवितेच्या पहिल्या भागांतील चिमुकल्या खेळकर, निरागस खारीचें, चैत्राच्या प्रशांत सकाळच्या पार्श्वभूमीवरील सहजरम्य व प्रसन्न वर्णन पुढील हृदयविदारक करुण प्रसंगाची अत्यंत परिणामकारी पार्श्वभूमि झाली आहे. रूपकात्मक काव्याच्या रचनेंतील कवीचें अभिजात कौशल्य या कवितेंत पूर्णपणें प्रत्ययास येतें. तसेंच भावनानुकूल वेचक व परिणामकारी सूचक शब्दांची निवड, प्रसंगानुरूप ओघवती व आवेशपूर्ण भाषा, अर्थपूर्ण व छोटीं म्हणीवजा वाक्यें वगैरे दृष्टींनींहि ही कविता चांगली वठली आहे. " किरण साधुनी झडपावें म्हणुनी पाही वाट," "सोसाट्यानें ये खालीं तीरासम ती घार। फांदीवरुनी एक उठे अस्फुटसा चीत्कार।" " आक्रंदन परि दुबळ्यांचें जगीं ऐकितो कोण?" इत्यादि ओळी या दृष्टीनें लक्षणीय आहेत.

## १०. सदानंद

ही हृदयस्पर्शी विलापिका काव्यविहारींच्या एका लाडक्या गोड मुलाच्या अकालीं निधनाच्या प्रसंगानें लिहिली गेली आहे. पित्याचें अंतःकरण पिळवटून टाकणाऱ्या अशा प्रकारच्या दुःखाची आर्तता या कवितेंत उत्कटतेनें व्यक्त झाली आहे. सुटसुटीत, अकृत्रिम ओघवती भाषा व धावतें वृत्त, काव्यांतील भावनेस पोषक झालें आहे. चिरंतन मानवी भावनांच्या यांतील उत्कृष्ट चित्रणामुळें ही कविता सहृदय वाचकांच्या अंतःकरणाचा वेध घेते. यामुळें काव्यविहारींच्या या एकमेव विलापिकेची मराठींतील उत्कृष्ट विलापिकांत गणना झाल्यावांचून राहणार नाहीं. [ विसर्प—धांवरें नांवाचा लहान मुलांना होणारा रोग ]

## ११. कृष्णेच्या पुलावरून

सांगलीस कृष्णा नदीवर Irwin Bridge नांवाचा पूल १९३० सालीं बांधून पुरा झाला आणि व्हाइसरॉय लॉर्ड इरविन यांचे हस्तें पुलाचें उद्घाटन झालें. या नव्या पुलावरून उत्तरेकडे दिसणारा कृष्णेचा प्रवाह वळण घेऊन दाट झाडींतून आल्यासारखा दिसतो, तर खालीं दक्षिणेकडे थोड्याच अंतरावर पुन्हा पश्चिमेकडे वळून झाडाझुडपांत लुप्त झाल्यासारखा दिसतो. या सकृद्दर्शनीं गूढरम्य दृश्याच्या दर्शनानें कवीला अज्ञात अनंतांतून येऊन अज्ञात अनंतांत विलीन होणाऱ्या कालप्रवाहाची आठवण होते. मानवी जीवनांत केवढ्याहि मोठ्या घटना सुखाच्या अगर दुःखाच्या घडोत, कालप्रवाह बेदरकारपणें अखंड चालूच राहतो. मानवाच्या पराक्रमाची अगर पराभवाची त्याला दादहि नसते. हा तात्त्विक विचार शेवटीं कवितेंत आला आहे. हा कालमहिमा आजवर अनेक काव्यांचा विषय झाला आहे. Men may come and men may go I will go on forever. या टेनिसनच्या Brooke कवितेंतील ओळींची या संदर्भांत स्मृति होते. साध्या विषयांतून मोठा तात्त्विक अर्थ काढण्याची ही प्रवृत्ति अनेक पाश्चात्य कवींतसुद्धां दिसून येते.

## १२. शिकार

एका कोंवळ्या निरागस सशाच्या पिलाच्या क्रूर हत्येचें अत्यंत कळवळून काढलेलें हें एक शब्दचित्र आहे. सशाच्या शिकारीसारख्या क्रीडा, करमणुकी किती अमानुष आहेत, त्यांत वाटणारा पराक्रम व आनंद किती हीन व आसुरी आहे हें कवीनें या कवितेंत प्रभावीपणें सूचित केलें आहे. श्रीमंत अगर सत्ताधारी यांचा गरीब वा दलित जनतेच्या जीवाशीं चाललेला खेळ त्यांना सहज व पौरुषाचा वाटत असला तरी मानवतेच्या दृष्टीनें तो अत्यंत निर्घृण व चीड आणणारा आहे हा विचारहि लक्षणेनें या कवितेंत व्यक्त होतो. एक हृदयस्पर्शी शब्दचित्र या दृष्टीनेंहि ही कविता मनाला चटका लावते. शेवटच्या दोन ओळींतील धारदार विरोध कोणाहि सहृदय माणसाचें अंतःकरण चिरत जाईल. बुधगांवचे श्रीमंत राजेसाहेब शिकारीला जात तेव्हां काव्यविहारीहि केव्हां केव्हां त्यांच्याबरोबर असत. त्या वेळीं समक्ष पाहिलेल्या

दृश्यावर ही कविता आधारलेली असल्यानें तिला प्रत्यक्ष अनुभूतीची बैठक आहे आणि म्हणूनच कवितेंत जिव्हाळा उतरला आहे. स्फूर्तिलहरींतील ‘ हरिणीप्रत ’ ही कविता याच संदर्भांत जरूर वाचण्यासारखी आहे.

## १३. दोन पतंग

काव्यविहारींचें हें एक प्रातिनिधिक रूपक आहे. इंग्रजांच्या भेदनीतीवर लक्षणेनें प्रकाश पाडण्याचें कार्य त्यानें साधलें असून त्या नीतीस भारतीय जनता बळी पडत होती याबद्दलचा उद्वेग या कवितेंत व्यक्त झाला आहे. समाजाला द्यावयाचा इषाराहि या कवितेंत सूचित आहे. व्यक्ति व प्रसंग सजीव करणारीं परिणामकारी वर्णनें, ओघवती व आवेशपूर्ण भाषा व रचनाकौशल्य या दृष्टींनीं ही कविता बऱ्याच वरच्या दर्जाची आहे.

## १४. माधुरी

राजघराण्यांतील एका अभिजात, रसिक व सौंदर्यसंपन्न स्त्रीचें हें काव्यमय शब्दचित्र रमणीय आहे. इतरत्र कोठें कोठें खडबडीत व गद्यप्राय वाटणारी काव्यविहारींची भाषाशैली अनुरूप विषय लाभतांच किती लालित्यपूर्ण व काव्यमय होते याचा प्रत्यय या कवितेंत येतो. “ शुक्राची चांदणी उतरली जणुं अस्मानांतुनी। सौधाच्या कोंदणीं जणूं ही लखलखते हिरकणी!” ही उत्प्रेक्षा म्हणजे भव्य व रम्य कल्पकतेचा एक उत्तम नमुना आहे.

## १५. जगाचा न्याय

काव्यविहारींच्या लोकप्रिय कवितांत ही सर्वश्रेष्ठ कविता आहे. काव्यविहारींची जीवनविषयक दृष्टि व त्यांची भाषाशैली यांचा ही कविता म्हणजे एक प्रातिनिधिक नमुना आहे. आर्थिक विषमता व सबलांकडून दुर्बलांवर सतत होत असणारा अन्याय वगैरेंबद्दल कवीला वाटणारा तीव्र उद्वेग त्या कवितेंत अत्यंत तळमळीनें व्यक्त झाला आहे. समाजांतील बहुसंख्य लोकांची पोटतिडीक सहजरम्य व प्रभावी भाषेंत या कवितेंत व्यक्त झाली असल्यानें अनेकांच्या अंतःकरणांत तिला स्थान लाभलें आहे व कवितेच्या गेयतेमुळें ती अनेकांच्या तोंडीं घोळत आहे हेंच तिच्या लोकप्रियतेचें गमक आहे.

## १६. मोटेवरचें गाणें

बुधगांव संस्थानचे सरजज्ज या नात्यानें खंडाळी नांवाच्या एका निसर्गरम्य खेडेंगांवांत काव्यविहारींचा वरचेवर मुक्काम होई. तेथील त्यांच्या निवासस्थानासमोरील एक निसर्गरम्य दृश्य हा या कवितेचा विषय आहे. काव्यविहारींचें ग्रामीण जीवनावरील प्रेम अभिनव आहे. खेड्याचें वातावरण व खेडुतांचें जीवन आणि त्यांचे विचार भावना व आशा-आकांक्षा यांना मराठी कवितेंत ज्या वेळीं क्वचितच स्थान मिळत असें त्या वेळीं काव्यविहारींनीं समरसतेनें ग्रामीण जीवनावर रम्य कविता लिहिल्या आहेत. स्फूर्तिलहरींतील ‘ संध्याकाळीं ’ व ‘ खेड्यांतील देखावा ’ या कविता या दृष्टीनें जरूर पाहाव्यात. त्यांच्या कवितेचा पिंड अशा काव्याला अनुकूल आहे. म्हणून खेडयापाडयांतील जनतेंत व बहुजनसमाजांत त्यांचें काव्य लोकप्रिय आहे. याच अर्थानें मराठींतील अगदीं मोजक्या व खऱ्याखुऱ्या जानपदकवींत त्यांची गणना करावी लागेल. (१) माचाड—मोटवणावरील धावेचें विहिरीकडील टोक. याच टोकावरील बांधीव जागेवर माचाडाची उभारणी असते. विहिरीकडे थोडें आंत गेलेले दोन दगड सुमारें चार फूट अंतरावर असतात व त्यांना मोठी चौकोनी भोकें असतात. भोकांत दोन उभे लाकडी सर असून त्यावर एक आडवा सर असतो. या सरावर मोटेचें चाक असतें. या सर्व लाकूडकामाला माचाड असें म्हणतात. (२) धाव–मोटेंचे बैल मागेपुढें जाण्यासाठीं माचाडाकडून विरुद्ध दिशेकडे जाणारी उतरती भर घातलेली वाट. (३) उसंत–अवकाश. (४) पचंगी–पांच हाती खादीचें कुणबाऊ धोतर. (५) फड–उसाचें दाट उभें पीक (६) मक्याण–मक्याचीं हिरवीं ताटें.

## १७. पाळीव पोपटास

पूर्वीं परतंत्र असलेल्या भारताचें हें एक रूपकात्मक चित्र आहे. ज्या काळांत ही कविता प्रसिद्ध झाली त्या काळीं ती अत्यंत लोकप्रिय कविता होती. काव्यविहारींच्या लोकप्रिय गेय कवितांपैकीं ही एक आहे.

## १८. मैना

हीहि एक रूपकात्मक कविता आहे. अशिक्षित व कलेची मुळींच आवड नसलेल्या एका धनिक तरुणाशीं विवाहबद्ध झालेल्या एका बुद्धिवान् रसिक,

व कलाप्रेमी तरुणीच्या मानसिक व बौद्धिक कुचंबणेचें जिव्हाळ्याचें चित्रण या कवितेंत केलें आहे. या दृष्टीनें कविता सरस वठली आहे.

## १९. माझें जन्मग्राम

सांगलीजवळील कृष्णावारणा संगमावरील एक निसर्गरम्य खेडें हरीपूर हें काव्यविहारी यांचें जन्मग्राम. एका काळीं संपन्न व समृद्ध असलेलें हें गांव कालगतीनें आज एक उध्वस्त खेडें झालें असलें तरी कै. नाट्याचार्य देवलांचें कांहीं काळ निवासस्थान व दाक्षिण महाराष्ट्रांतील एक पवित्र क्षेत्र म्हणून आजहि या गांवाला महत्त्व आहे. जन्मभूमीसंबंधीचें प्रेम व जिव्हाळा काव्यविहारींच्या या कवितेंत उत्कटतेनें व्यक्त झाला असून त्याच्या उज्ज्वल भवितव्याकडे त्यांचे डोळे आशेनें लागले आहेत. येणाऱ्या कालाकडे व पिढीकडे विकासक्षमतेच्या भरंवशानें व द्रष्ट्याच्या आशावादी दृष्टीनें पाहणाऱ्या काव्यविहारींचें आपल्या जन्मग्रामासंबंधीचें स्वप्न खात्रीनें साकार होईल. "नैर्ऋत्येकडील वारा" ही केशवसुतांची कविता या संदर्भांत जरूर वाचून पाहावी.

## २०. उंबरांतले किडे

पारंपरिक रूढ विकारांच्या संकुचित जगांत मळलेल्या चाकोरींतूनच कालक्रमण करणाऱ्या कूपमंडूकवृत्तीच्या अल्पसंतुष्ट लोकांच्या जीवनाचें हें उपरोधात्मक रूपक काव्यविहारींच्या वैशिष्ट्यपूर्ण रूपकांपैकीं एक आहे. इवल्याशा जगांत चाललेलें क्षुद्र सत्ताधाऱ्यांचें कौतुक, क्षुद्र मानापमान, हीन हेवेदावे, पुळचट पराक्रम, लाचार खुशामती, वगैरेंचें हें उपहासात्मक चित्रण अत्यंत परिणामकारी झालें आहे. काव्यविहारींच्या लोकप्रिय कवितांपैकीं ही एक आहे.

## २१. तुझा देव

कवीची देवविषयक भूमिका या छोट्याशा कवितेंत व्यक्त झाली आहे. देवाविषयींची आंधळी श्रद्धा माणसाला निष्क्रिय व दुर्बल बनविते व असला देवभोळेपणा व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीला मारक ठरतो, हा विचार कवीनें या कवितेंत ठामपणानें मांडला आहे. प्रत्येक व्यक्तीनें आपल्या

कर्तबगारीच्या जोरावर परिश्रमानें आपली योग्यता वाढवीत राहिलें पाहिजे म्हणजे "नराचा नारायण" झाल्याशिवाय राहणार नाहीं असा प्रयत्न-वादाचा स्फूर्तिप्रद व तेजस्वी संदेश कवीनें या कवितेंत दिला आहे. तसेंच प्रयत्नवादाबरोबर त्यागाचाहि संदेश या कवितेंत आहे.

## २२. शंकर आणि नंदी

खटकेबाज संवाद व नाट्यपूर्ण प्रसंग यामुळें अत्यंत परिणामकारी झालेली ही कविता कवीच्या कथारचना-कौशल्याचा व भेदक उपरोधाचा वाचकास प्रत्यय आणून देते. ही कवितासुद्धां कवीच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक रूपकांपैकींच एक होय. सामाजिक व्यंगाचें अचुक निदान व त्यावर ओढ-लेले रूपकात्मक प्रच्छन्न कोरडे वगैरेंमुळें ही कविता अत्यंत परिणामकारक झाली आहे. काव्यविहारींच्या अत्यंत लोकप्रिय कवितांपैकीं ही एक आहे. या कवितेचें स्वरूप पौराणिक असलें तरी लक्षणार्थ सामाजिक व निरंतर ताजा आहे. शंकर म्हणजे तामसी सत्तेचें प्रतीक आणि उमा म्हणजे सदसद्विवेकबुद्धि अशी कल्पना केली तर "तामसी सत्तेला खूष करण्यासाठीं सदसद्विवेकबुद्धीला न पटणारा होकार आपण दिला तर गुलामगिरी हें अशा अपकृत्याचें फळ ठरलेलेंच आहे" असा या कवितेचा ध्वन्यर्थ आहे.

## २३. उत्तरेकडे

हिमालयांतील विलोभनीय भव्योदात्त निसर्गसौंदर्य समक्ष पाहण्याची कविमनाला लागलेली ओढ या काव्यांत व्यक्त झाली आहे. पराक्रमानें पावन झालेली चितोड पानिपतासारखी धारातीर्थें अवलोकन करण्याची कवीची उत्कट इच्छाहि या कवितेंत व्यक्त झाली आहे. कडव्या व शूर महाराष्ट्राच्या रास्त अभिमानाबरोबरच भावनाप्रधान व त्यागी क्रांतिवीरांची जन्मभूमि बंगाल व शीखांची विक्रमभू पंजाब यांच्याबद्दलहि कवीला अभिमान वाटतो. कवीच्या देशाभिमानाला प्रांतीय मर्यादेचें कुंपण नाहीं, तो राष्ट्रव्यापी आहे. म्हणूनच सातपुड्याचे कडे उल्लंघून उत्तरेकडील पानि-पतावर स्वैर भटकावें, गंगातीरावरून भटकत भटकत बंगाल गांठावा अशी तळमळ कवीला लागली आहे. उत्तम गेय चालीमुळें व त्यांतील दृश्यांच्या धांवत्या ओघामुळें ही कविता लोकप्रिय झाली आहे.

## २४. पायरीवर

१९४२–४३ मधील क्रांतिसंग्रामाच्या ऐन धुमाळींत ही कविता किर्लोस्करमध्यें प्रथम प्रसिद्ध झाली. त्या वेळीं ‘ व्हाइस रीगल लॉज ’च्या बंद दरवाजापुढील पायरीवर उभे राहून कोणीतरी तो दरवाजा ठोठावीत आहे असें चित्र किर्लोस्करांत काढण्यांत आलें होतें. त्यावरून व आम्हीच ‘ पुढुनि फोडावे । तेधवां खुलें होणार ’ या ओळीवरून या कवितेंतील राजकीय रूपक स्पष्ट होईल. क्रांतिप्रवण तरुणांच्या मनाची पकड या कवितेनें स्वाभाविक-पणेंच घेतली होती. काव्यविहारींचें हें एक वैशिष्ट्यपूर्ण राजकीय रूपक आहे.

## २५. वीरमाता

अर्वाचीन मराठी काव्यांतील वेचक व उल्लेखनीय कथाकाव्यांपैकीं हें एक आहे. १९४२ च्या ‘ चले जाव’ आंदोलनांत कांहीं तरुणांनीं भूमिगत राहून क्रांतिकार्य केलें. सातारा जिल्ह्यांतील जनतेंत या क्रांतीच्या उठावाला भरीव पाठिंबा सर्वांकडून लाभला. अशाच एका भूमिगत तरुणाच्या थोर मातेची ही करुणोदात्त कथा आहे. यांतील खारट घुटक्याची कल्पना सुप्रसिद्ध कादंबरीकार Maxim Gorky याच्या Mother कादंबरींतील एका घटनेवरून सुचली असावी. जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय, मोजक्या शब्दांत काढलेलीं उठावदार स्वभावचित्रें, कथेच्या आरंभापासून अखेरपर्यंत टिकविलेली उत्कंठा, कथानकांतील चटकदारपणा, नाट्यमय प्रसंगाची निर्मिति, ‘ खारट घुटका ” सारखी वेचक व अर्थगौरवपूर्ण शब्दरचना, वातावरण-निर्मिति, वगैरे गुणांमुळें हें वीररसप्रधान काव्य उत्तम वठलें आहे.

## २६. देवी चामुंडा

क्रांतिदेवतेचें तात्त्विक स्वरूप स्पष्ट करणारें हें एक सरस शब्दचित्र आहे. देवी चामुंडेनें चालविलेला विश्वसंहार विधायक स्वरूपाचा आहे. त्यांत अशुभ कांहींच नाहीं. त्यांतूनच नव्या जगाची निर्मिति होणार आहे, म्हणून या विश्वसंहाराकडे धीरानें व आशावादीपणानें पाहिलें पाहिजे असा विचार या कवितेंत मांडण्यांत आला आहे. कधीं कधीं रुद्र दिसणारें महादेवाचें स्वरूप खरोखर अंतीं शिवच असतें, तसाच हा चामुंडेचा संचार आहे.

यांतील चामुंडेचें शब्दचित्र अत्यंत उठावदार वठलें आहे. कवितेची भाषा ओजस्वी असल्यानें कवितेच्या आशयासहि उठाव आला आहे.

## २७. विमान आणि कोंबडा

कर्तबगारी व कुवत यांची शिदोरी अल्प असल्यामुळें ‘भव्य, उदात्त व उच्च असें कांहीं करण्याची ताकद नसणारांची ईर्षा कशी थिटी पडते याचें हें रूपकात्मक चित्रण आहे. जगांतील इतर राष्ट्रांच्या मानानें शास्त्रीय ज्ञान, सामाजिक प्रगति, विचारांची खोली व विशालता आणि राजकीय सामर्थ्य वगैरे बाबतींत आपण किती खुजे आहोंत याची दुःखकारक जाणीवहि सूचकतेनें या कवितेंत व्यक्त झाली आहे. हें प्रभावी, सामाजिक व राजकीय रूपक उद्बोधक व मनोरंजक आहे.

## २८. माझा देव

देवाविषयीं या कवितेंत व्यक्त झालेलीं कवीचीं मतें शुद्ध बुद्धिवादी आहेत. कवि नास्तिक नाहीं पण त्याची देवविषयक श्रद्धा डोळस आहे. “चैतन्य जगीं स्फुरवी तो देव माझा” अशी कवीची देवाबद्दलची भावना असून या देवावर त्याची पूर्ण श्रद्धा आहे. अशी श्रद्धा माणसाला कर्तव्य-दक्ष व कार्यप्रवण राखण्यास समर्थ ठरते. निर्वाणीच्या प्रसंगीं मानवी मनाला ती धीर देऊं शकते.

## २९. यंत्र

काटेकोर ठरीव कार्यक्रमांत यांत्रिक जीवन घालविणाऱ्या एका नेमस्त अधिकाऱ्याचें हें शब्दचित्र आहे. या चित्राच्या व्यक्तिरेखा अगदीं स्पष्ट असल्यानें चित्र उठावदार झालें आहे. काव्यविहारींच्या अत्यंत नियमित जीवनालाहि हें वर्णन यथार्थपणें लागू पडूं शकेल, मात्र फरक इतकाच कीं यंत्र भावनाशून्य असतें आणि काव्यविहारी अत्यंत भावनाप्रधान आहेत. जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि ताजीतवानी व उमेदीची आहे. यांत्रिक नीरसता त्यांच्या वृत्तींत नाहीं.

## ३०. नवा मानव

काव्यविहारींच्या जीवनदृष्टीची प्रगतिशीलता, बुद्धीची नवविचार ग्रहण करण्याची तयारी, व भावी कालाबद्दलचा आशावाद या कवितेंत व्यक्त

झाला आहे. एक प्रकारच्या द्रष्टेपणानें नव्या मानवाचें कल्पनाचित्र त्यांनीं रेखाटलें आहे. स्वतंत्र–मानवतादी नव्या युगाचें चित्रण त्यांनीं या कवितेंत केलें आहे. त्यांनीं काढलेलें नव्या युगांतील नव्या मानवाचें चित्र कै. केशवसुतांच्या "नवा शिपाई" या बरोबर ताडून पाहण्यासारखें आहे. समता विश्वबंधुत्व व निसर्गावर मिळविलेला विजय हीं काव्यविहारींनीं वर्णिलेलीं नव्या मानवाचीं वैशिष्ट्यें आदरणीय आहेत.

## ३१. माझी मैत्रीण

पंढरपूरच्या पूर्वेस १५ मैलांवर असलेलें सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यांतील 'खंडाळी' हें निसर्गरम्य खेडें विलीन बुधगांव संस्थानांतील एक तालुक्याचें ठिकाण होतें. सबजज्ज या नात्यानें काव्यविहारींचा तेथें वरचेवर मुक्काम होई. तेथील त्यांचें कोर्ट व निवासस्थान यांच्या भोंवतींच्या निसर्गरम्य दृश्याचें वर्णन या कवितेंत आलें आहे. तेथील एका लिंबाऱ्यावर बसलेल्या साळुंकीनें कवीला वेड लावलें. या कवितेंतील साळुंकीचें स्वभावोक्तिपूर्ण वर्णन मोठें रमणीय आहे. कवीचें निसर्गप्रेम या कवितेवरून दिसून येतें. निसर्गाशीं असलेलें त्यांचें हें जिव्हाळ्याचें नातें आंग्ल कवि वर्ड्सवर्थची आठवण करून देतें.

## ३२. राजा आणि माळी

कवीचीं समाजवादी मतें या कवितेंत सूचित होतात. तसेंच कवीला श्रमजीवी वर्गाबद्दल वाटत असलेलें प्रेम या कवितेंत व्यक्त झालें आहे. जगांत पैशाची वांटणी कितीहि विषम असली तरी सुखाची व शांतीची वांटणी हें परमेश्वराचें राखीव खातें आहे. नाहीं तर गरिबांच्या वांट्याला सुखाचा कणदेखील आला नसता अशी कवीची श्रद्धा आहे. म्हणूनच राजवाड्यापेक्षांहि गरिबाच्या झोपडींत कधीं कधीं उमाप आनंद दिसतो हें कवीचें आवडतें तत्वज्ञान या कवितेंत आहे.

## ३३. बकुळीखालीं

कवीच्या बालपणांतील एक भावरम्य स्मृति हा या कवितेचा विषय आहे. सात्विक प्रेमभावनेच्या मंदमधुर सुगंधानें सर्व कविता दरवळून गेल्यासारखी वाटते. कवितेंतील भावनेचा हळुवारपणा तितक्याच हळुवार भाषेंत

व्यक्त झाला आहे. बाळपणींच्या एका परकऱ्या शेजारभगिनीची प्रेमळ स्मृति कवीनें एखाद्या बकुळीच्या फुलाप्रमाणें मनोमंजूषेंत दीर्घकाल जपून ठेविली होती. अनेक वर्षांनीं पूर्वीच्याच त्या बकुळीखालीं कवि सहज गेला असतांना कवीच्या मनांतील त्या स्मृति पुन्हा उफाळून येतात व जीवनाची विविध कोडीं सोडवून शिणलेल्या कविमनाला उल्हसित करतात असा अनुभव या आत्मनिष्ठ कवितेंत कवीनें वर्णिला असल्यानें कविता हृद्य झाली आहे. या कवितेंत वर्णिलेली बकुळी हरिपूर येथील संगमेश्वराच्या देवळांत प्रदक्षिणेच्या वाटेवर आजहि आहे.

## ३४. भानुदास

समाजांतील उपेक्षिताबद्दलचा कवीचा जिव्हाळा या कवितेंत व्यक्त झालेला आहे. ही एक मानवतावादी कविता आहे. गुन्हेगार मुलें सांभाळण्यासाठीं ठेवून घेऊन त्यांच्या उन्नतीसाठीं व सुधारणेसाठीं खटपट करणाऱ्या संस्था व व्यक्ति यांच्याविषयीं कवीला अत्यंत आदर आहे. या गुन्हेगार मुलांना समाजांत मानानें जगतां आलें पाहिजे व असें जीवन जगण्याची संधि त्यांना प्राप्त करून देणें हें समाजाचें कर्तव्य आहे असें कवीचें मत आहे. सौ. मधुमालती कुलकर्णी B. A. B. T. यांच्या कुशल नेतृत्वाखालीं चाललेल्या सांगलीच्या 'रिमांडहोम' मधील 'भानुदास' नांवाचा एक गुन्हेगार मुलगा या कवितेचा विषय आहे.

## ३५. वेडीं मुलें

१९५१ च्या एप्रिल महिन्यांत सांगलीस भरलेल्या अ. भा. शा. शि. परिषदेचे अध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध क्रांतिकारक सरदार पृथ्वीसिंह सांगलीस आले होतें. त्यांच्याशीं झालेल्या मुलाखतीच्या प्रसंगीं या कवितेंतील मध्यवर्ती कल्पना काव्यविहारींना सुचली. स्वातंत्र्याच्या प्रेमामुळें वाटेल ते हाल भोगण्यास व वाटेल तो त्याग करण्यास सिद्ध झालेले देशभक्त अगर क्रांतिवीर जगाच्या दृष्टीनें वेडेच ठरतात. पण अशा वेड्या मुलांच्या अतुल त्यागानेंच मातृभूमीचे पांग फिटतात. पारतंत्र्याच्या शृंखला खळकन् तुटून पडतात आणि स्वातंत्र्यसूर्याचा उदय होतो. म्हणून असलीं वेडीं मुलें खरोखर धन्य होत. अशा वेड्या मुलांबद्दलची कृतज्ञता व आदर या कवितेंत व्यक्त झाला आहे.

## ३६. ती रात्र

समुद्रकिनाऱ्यावरील प्रशांत व निसर्गरम्य सौंदर्यांत मानवी मनाचें औदासीन्य पार नाहींसें करून त्याला उल्हसित करण्याचें सामर्थ्य कवीला वेंगुर्लें येथील समुद्रकिनाऱ्यावरील बंगल्यांतील एका रात्रीच्या मुक्कामांत प्रकर्षानें प्रतीत झालें. त्या गोड अनुभवाचें काव्यमय वर्णन या कवितेंत आहे. वेंगुर्ल्याला तेथील रहिवासी अभिमानानें "कोंकणराणी" म्हणतात. ही कविता वाचून त्या अभिधानाची सत्यता आपणांस पटते. अशीं दृश्यें म्हणजे निरामय आनंदाचा व उत्साहाचा अखंड झराच होय. ही वर्ड्‌स्वर्थची उक्ति ही कविता वाचतांना सार्थ वाटते.

## ३७. कृष्णवर्तुळें

स्वतःच्या पत्नीला उद्देशून लिहिलेली ही आत्मनिष्ठ कविता कवीच्या सुखी कौटुंबिक जीवनाचें सोज्वळ चित्र आहे. जीवनाच्या खडतर यात्रेंत सतत साथ देत असलेल्या आपल्या पत्नी-बद्दलची कौतुकपूर्ण कृतज्ञतेची व जिव्हाळ्याची भावना हा या कवितेचा विषय आहे. कुटुंबवत्सल गृहिणीचें या कवितेंत वर्णिलेलें सात्त्विक व्यक्तिमत्व आदरणीय व हृद्य वाटतें.

## ३८. नंदीवाला

नंदीवाल्याचें हें शब्दचित्र प्रा. डॉ. वि. म. कुलकर्णी यांच्या 'लमाणाचा तांडा' या कवितेची आठवण करून देतें. या लोकांत आढळणारी माणुसकी व जीवनाबद्दलचा आशावादी दृष्टिकोन कोणाच्याहि कौतुकास पात्र व्हावा असा नसतो का ? रोजच्या भटक्या वृत्तीमुळें येणारा कणखरपणा व मिळेल त्यांत समाधान मानण्याची त्यांची प्रवृत्ति या कवितेंत वर्णिलेली आहे. या कवितेचा शेवट आकस्मिक व तात्त्विक आहे. या कवितेंत वर्णिलेल्या गणेश-मंदिराचा उल्लेख याच संग्रहांतील 'माझें जन्मग्राम' या कवितेंत आहे.
१ बाळा नंदी—पांढऱ्यावर काळे ठिपके असलेल्या रंगाचा बैल.

## ३९. प्रदक्षिणा

संकटांनीं भारावलेल्या एका खेडेगांवांतील मध्यम वर्गीय स्त्रीचें चित्र या कवितेंत रेखाटलें आहे. रोज नियमानें पिंपळाला प्रदक्षिणा घालणाऱ्या एका उदास स्त्रीला पाहून कविमनाला यातना होतात. पण अंधश्रद्धेमुळें

दैववादी झालेली तिची वृत्ति कवीच्या बुद्धिवादी मनाला मानवत नाहीं. कारण प्रयत्नवादावरच कवीची अढळ श्रद्धा आहे. म्हणून

परि प्रदक्षिणांनीं टळल्या विपदा कुणा ?
हटतील संकटें कशी झगडल्याविना ?

या ओळींत प्रयत्नवादाचाच पुरस्कार त्यांनीं केलेला दिसून येतो.

## ४०. तीन खून

अन्नधान्य टंचाईच्या काळांतील भीषण आर्थिक समस्येचें चित्रण या कवितेंत झालें आहे. ही भीषण व सत्य घटना आहे. गरिबांच्या दारुण दुरवस्थेचें हें चित्र कोणाचेंहि हृदय पिळवटून टाकणारें आहे. मध्यरात्रीच्या काळ्याकुट्ट अंधाराची पार्श्वभूमि यांतील घटनेच्या भीषणतेंत भर घालीत आहे.

## ४१. महर्षि

वंदनीय महर्षि अण्णासाहेब कर्वे यांचे हें क्षणचित्र (Snap shot) त्यांतील मोजक्या व वेंचक तपशीलामुळें उठावदार झालें आहे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें हें चित्रण भव्योदात्त आहे. ता. २२।१।१९४७ रोजीं महर्षि कर्वे कवीकडे बुधगांवास आले होते. त्या स्मृतीवर ही कविता आधारली आहे.

## ४२. विहगास

ही रूपकात्मक कविता म्हणजे ध्येयवादी तरुणाला दिलेला आशीर्वादच आहे. साठी गांठत असलेल्या कवीच्या मनाची उमेद केवढी मोठी, व ध्येयवादाची भरारी किती उंच आहे हें कवितेवरून दिसून येतें. ध्येया-मागील बेछूट दौड व दुर्दम्य आकांक्षा पुऱ्या करण्याची अविरत धडपड हीच तारुण्यांतली खरी मौज आहे. हा कवितेंतील संदेश आहे.

## ४३. तूं शांत झोंप घेई

दिवसभर संसाराचा गाडा ओढणाऱ्या कष्टाळू गृहिणीस पतीनें दिनांतीं दिलेला दिलासा हा या कवितेचा विषय हृद्य आहे. जीवनाकडे पाहण्याचा कवीचा आशावादी दृष्टिकोन याहि कवितेंत व्यक्त होतो.

## ४४. स्फूर्ति

कवीची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करणारी या संग्रहांतील ही दुसरी कविता. ‘ माझी कविता ’ या कवितेशीं या कवितेची तुलना करतां कवीची काव्यविषयक दृष्टि अधिक सखोल व विशाल झाल्याचें दिसतें. कवित्वशक्ति ही दैवी देणगी असून ती कवीची वैयक्तिक मालमत्ता नव्हे असा विचार कवीनें या कवितेंत मांडला आहे. तिच्या प्रसादाविना काव्यरचना चालू ठेवणें काव्यविहारींना पसंत नाहीं.

## ४५. पंडित जवाहरलाल

पंडित नेहरूंचें हें व्यक्तिचित्र त्यांतील भव्योदात्त कल्पनामुळें विशेष आकर्षक झालें आहे. पंडितजींच्या व्यक्तिमत्त्वाला दिलेली हिमालयाची उपमा अत्यंत समर्पक अशी आहे.

## ४६. एक मागणें

कवीची आदर्श जगाची कल्पना या कवितेंत व्यक्त झाली आहे. कै. माधव जुलियन यांच्या “ तेथें चल राणी ” या कवितेंत वर्णिलेल्या आदर्श जगाशीं या कवितेंत वर्णिलेली आदर्श जगाची कल्पना, अभ्यासूंनीं ताडून पाहावी. ही कविता काव्यविहारींच्या कविजीवनाच्या प्रारंभकालांतील आहे ही विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे.

REFBK-0008348
क्रमांक
नों. दि.